। लातूर । वर्ष ३५ वे । अंक ४५ वा । शुक्रवार, दिनांक ०१ मे २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे




# २ ते १४ मे दरम्यान बीकेसी येथे
# महालक्ष्मी सरस चे आयोजन

**मुंबई/ प्रतिनिधी:** महालक्ष्मी सरस महाराष्ट्रात महिलांच्या सक्षमीकरणाचे एक प्रभावी प्रतीक म्हणून उदयास येत आहे. राज्यात ५० लाखांहून अधिक 'लखपती दीदी' सक्रिय आहेत. या महिला केवळ उद्योजिका नसून, त्या रोजगार निर्माण करणाऱ्या तसेच आपले कुटुंब व समाजाच्या आर्थिक प्रगतीत महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या ठरत आहेत. अशा महिला उद्योजकांचे 'महालक्ष्मी सरस' हे प्रदर्शन २ ते १४ मे या कालावधीत बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) येथे आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन महिला उद्योजिकांसाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध करून देणारी आणि सर्वसामान्य नागरिकांना वेगळा अनुभव देणारे ठरेल, असा विश्वास 'उमेद-एमएसआरएलएम'चे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

मुंबई प्रेस क्लब येथे प्रदर्शनाची माहिती देण्यासाठी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत उमेदचे मुख्य परिचालन अधिकारी निखिल ओसवाल उपस्थित होते. यावेळी श्री निलेश सागर म्हणाले की, उमेद अभियानांतर्गत महालक्ष्मी सरस आता एक व्यापक रूप धारण करत




आहे. या माध्यमातून महिलांना रोजगारासोबत आत्मनिर्भरता, नेतृत्व आणि सामाजिक ओळख मिळत आहे. ही चळवळ ग्रामीण महिलांना संघटित करून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. महिला उद्योजिका आता पूर्वीप्रमाणे केवळ वाळवणीचे पदार्थ नव्हे तर ग्रामीण भागात शेतमाल आधारित प्रक्रिया उद्योगही उमेदीने करत आहेत. महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शनसारख्या उपक्रमाद्वारे महिला उद्योजिकांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे. आतापर्यंत महिलांना ५०,००० कोटी रुपयांहून अधिक कर्ज वितरित करण्यात आले आहे. केवळ मागील वर्षातच १०,००० कोटी रुपयांचे कर्ज महिला उद्योजिकांना देण्यात आले. महत्वाचे म्हणजे महिला उद्योजिकांचे कर्ज परतफेडीचे प्रमाण हे तब्बल ९८ टक्के आहे. राज्यात ५० लाखांपेक्षा जास्त लखपती दीदी निर्माण झाल्या असून, त्यांच्या उत्पन्नात सातत्य राहावे, यासाठीही शासन स्तरावर प्रयत्न सुरु असल्याचे निलेश सागर यांनी सांगितले.

या प्रदर्शनात एकूण ५०० स्टॉल्स उभारण्यात असून यात यामध्ये महाराष्ट्रातील २३०, इतर राज्यातील ६६, नाविन्यपूर्ण उपक्रम करणाऱ्या महिला गटांचे ६८ तसेच महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांचे (एफपीओ) ३४ स्टॉल्स समाविष्ट आहेत. याशिवाय नाबार्ड, माविम, खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई महानगरपालिका तसेच आदिवासी व कृषी विभागासह विविध शासकीय संस्थांचे २२ स्टॉल्सही यात आहेत. प्रदर्शनातील एक प्रमुख आकर्षण म्हणजे ८० स्टॉल्सचा वातानुकूलित फूड कोर्ट, जिथे राज्यातील विविध भागातील महिलांनी तयार केलेले पारंपरिक व स्वादिष्ट पदार्थ उपलब्ध असतील. तसेच हातमागाची वस्त्रे, वारली व बंजारा कला, लाकडी खेळणी, आकर्षक दागिने आणि इतर ग्रामीण उत्पादने खरेदी करण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे. खरेदी केलेल्या सामानाच्या पिशव्या ठेवण्यासाठी लॉकर्सची व्यवस्था येथे करण्यात आली आहे. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत. उमेद परिवारात जवळपास ६५ लाख सदस्य आहेत. त्यांना येथे आपआपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे, असे निलेश सागर यांनी सांगितले.

पुढे म्हणाले की, यावर्षी महालक्ष्मी सरसमध्ये एआर फोटोग्राफी, ॲनामॉर्फिक वॉल्स आणि इन्फोग्राफिक वॉल्ससारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. तसेच ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती आणि गर्भवती महिलांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी २५ किलोमीटर परिसरात मोफत होम डिलिव्हरीची सुविधादेखील उपलब्ध आहे. येथे महाराष्ट्राव्यतिरिक्त केरळ, गुजरात, बिहार, तामिळनाडू, कर्नाटक, जम्मू आणि काश्मीर, उत्तर प्रदेश यासह अनेक राज्यांचे ६० पेक्षा जास्त स्टॉल्स राहतील.

ते पुढे म्हणाले की, महिलांना केवळ विक्रीचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा शासनाचा उद्देश नाही, तर त्यांना संघटित, टिकाऊ आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक उद्योजिका बनवण्याचे ध्येय आहे. महालक्ष्मी सरसच्या माध्यमातून 'लोकल टू ग्लोबल' ही संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे. यावर्षी 'कंटेनर' या संकल्पनेद्वारे महिला उद्योजकता आता निर्यात, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि जागतिक संधींकडे झपाट्याने वाटचाल करत असल्याचा संदेश देण्यात आला आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म, ब्रँडिंग आणि ई-कॉमर्सच्या माध्यमातून महिलांना नवी ओळख मिळवून देण्यासाठी आणि त्यांची उत्पादने राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहोचवण्यासाठी शासन शासन कटिबद्ध आहे, असेही श्री सागर यांनी यावेळी सांगितले.

# महाराष्ट्रात आधुनिक विषाणू निदान प्रयोगशाळांचे जाळे उभारण्याचा महत्वपूर्ण निर्णय: मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई/ प्रतिनिधी: राज्यात आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून विषाणू निदान प्रयोगशाळांचे जाळे उभारण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे.**



या संदर्भात १३ जुलै २०१७ रोजी तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्र्यांना पत्र लिहून केंद्र शासनाच्या आरोग्य संशोधन विभागामार्फत देशभर उभारण्यात येणाऱ्या १५० अत्याधुनिक विषाणू प्रयोगशाळांच्या उपक्रमाचे स्वागत करत महाराष्ट्राला योग्य वाटा देण्याची मागणी करण्यात आली होती. या पत्रात देशाच्या मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागपूर आणि राज्याची राजधानी मुंबई येथे राज्यस्तरीय प्रयोगशाळा तसेच राज्यातील विविध विभागांतील दहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा मंजूर करण्याची विनंती करण्यात आली होती.

केंद्र शासनाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे राज्यस्तरीय विषाणू प्रयोगशाळा मंजूर केली. याशिवाय इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर तसेच अकोला, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, धुळे आणि मिरज येथील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उभारण्यास मान्यता देण्यात आली.

या योजनेसाठी केंद्र शासनाकडून एकूण २९ कोटी २१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. या निधीतून अत्याधुनिक यंत्रसामग्री खरेदी करून प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आल्या. कोविड-१९ महामारीच्या काळात या प्रयोगशाळांनी आरटी-पीसीआर चाचण्यांद्वारे मोठी भूमिका बजावली.

याशिवाय, या प्रयोगशाळांमुळे विविध विषाणूजन्य आजारांचे निदान करणे शक्य झाले आहे. आतापर्यंत कोविड-१९ (३७,२१,१५४), डेंग्यू (८८,३२७), चिकनगुनिया (३९,८१७), झीका (३,९२३), स्क्रब टायफस (७,०९१), इन्फ्लुएंझा (२७,५३६), एचबीव्ही (१,५३,१८०), रोटाव्हायरस (६५१) अशा एकूण ४०,४१,६८९ रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळाली असून भविष्यात उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजारांशी लढण्यासाठी राज्य अधिक सक्षम झाले आहे.

# अतिक्रमण विरोधी मोहीम राबवून वाहतुकीला शिस्त लावा: माजी मंत्री आ.अमित देशमुख



**लातूर प्रतिनिधी:** शहरातील वाहतूक व्यवस्थेला शिस्त लावण्याची गरज आहे त्यासाठी रस्त्यावरील अतिक्रमणे हटवावीत वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी सर्व उपाययोजना राबवाव्यात, अशा सूचना माजी मंत्री आ. अमित देशमुख यांनी दिल्या.लातूर शहर महानगरपालीकेत सर्व योजनांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी,निधीचा विनियोग योग्य होईल याची दक्षता घ्यावी. योजनांची कामे ठरलेल्या वेळापत्रकानुसार दर्जेदार पद्धतीने करावीत.एकूण कारभार पारदर्शकआणि लोकाभिमुख राहील, हे पाहावे अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

बुधवारी आ.अमित देशमुख यांनी खा. डॉ.शिवाजी काळगे यांच्यासह लातूर महानगरपालिकेत महापौर सौ.जयश्री सोनकांबळे, उपमहापौर ड.स्नेहल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ड. किरण जाधव, माजी महापौर दिपक सुळ, काँग्रेसचे गटनेते विजयकुमार साबदे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, परिवहन समिती सभापती फैसलखान कायमखानी, मनपा आयुक्त मानसी मीना,अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे यांच्या उपस्थितीत बैठक घेतली.

शहरात सध्या राबविण्यात येत असलेल्या विकास योजना, प्रस्तावित योजना,नियमित कामकाजाबाबत आढावा घेतला.सध्या उन्हाळी सुट्ट्या आणि लग्न समारंभांचे दिवस असल्याने शहरात वाहतूक कोंडीच्या तक्रारी येत आहेत.यावर तातडीने कार्यवाही करून शहरातील वाहतुकीला शिस्त लावावी.सिग्नल आणि सीसीटीव्ही यंत्रणा अद्ययावत करावी. हा प्रश्नकायमस्वरूपी सोडवण्यासाठी प्रभावीपणे अतिक्रमणविरोधी मोहीम राबवावी.शैक्षणिक संस्था, मंगल कार्यालये, रुग्णालये, व्यापारी प्रतिष्ठाने तसेच रहिवासी संकुलांत पार्किंग व्यवस्था अनिवार्य करावी. शासनमान्य सल्लागाराची नियुक्ती करून भविष्यातील नियोजनकरावे. प्रदूषणाचा स्तर कमी राहील यासाठी प्रयत्न करावेत अशी सुचना त्यांनी दिली

शहरातील कचरा व्यवस्थापनात सुधारणा झाली असली तरी त्यात आणखी दुरुस्त्या करा. कचऱ्यावर प्रक्रिया करून ढीग लागणार नाहीत याची काळजी घ्यावी. या कामकाजात महिलांचा सहभाग वाढवावा, असे आ.देशमुख म्हणाले. शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य-दिव्य पुतळा उभारणीचे काम सुरू झाले आहे.या कामाचा दर्जा आणि पारदर्शकतेबाबत तक्रारी आहेत. या प्रकल्पाचे पुनरावलोकन करावे. हैदराबादच्या धरतीवर हे काम व्हावे, अशी लोकभावना असल्याने तेथे अभ्यास गट पाठवून सूचना घ्याव्यात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्कचा सर्वंकष विकास आराखडा तयार करून स्मारकाची उभारणी करावी असे त्यांनी सांगीतले.

शहरात नियमित पाणीपुरवठा होण्यासाठी वेळापत्रकाचे काटेकोर पालन करावे. पिवळे किंवा दूषित पाणी वितरित होणार नाही याची काळजी घ्यावी. ठिकठिकाणी होणारी गळती थांबवावी. हरंगुळ जलशुद्धीकरण केंद्रातून बाहेर सोडण्यात येणाऱ्या अशुद्ध पाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करावा असे निर्देश मनपा प्रशासनाला दिले. शहरातील पथदिव्यांची देखभाल नियमित व्हावी.घर तिथे पथदिवा अशी योजना तयार करून विस्तार करावा. मंजूर सोलर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करून वीज वापराच्या बाबतीत महापालिका स्वयंपूर्ण करावी. नागरिकांना बांधकाम परवाना मिळण्यात होणारी दिरंगाई टाळावी. नागरिकांना मनस्ताप होणार नाही याची काळजी घ्यावी आणि दिलेल्या परवान्याप्रमाणेच बांधकामे होतील याची दक्षता घ्यावी. शहरातील प्रलंबित कबाले वाटपाचा आढावा घेऊन, नियमानुसार असलेले कबाले वाटप ताबडतोब करावेत, यासाठी शासनाच्या नवीन धोरणाचा आधार घ्यावा असे यावेळी सांगीतले.

रोज वाचा
ऑनलाईन
लातूर समाचार
www.
latursamachar.
com

## प्रभात किरणे

भव्य मंदिरात,
भक्त भक्तांच्या रांगेत
न कळे कोणा,
कोणाची कोणती
जात पूजा दर्शन
करून जाती स्व
गावात करीभेदभाव,
जगे जगणं अज्ञानात
-इंजि. नागनाथ
कलवले लातूर
९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



०९ मे ते २१ मे
दरम्यान CET
परीक्षा...

## चिमटा
दयाचा



लातूरात अनेक
पुतळे उभा आहेत!
त्यांच्या देखभालीकडे
दुर्लक्ष आहे !!
आजू-बाजूची
हिरवळ सुखली
जात आहे!!!



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## महाराष्ट्राची शान व मान वाढवा

१ मे १९६० रोजी लौकिकार्थाने महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली असली, तरी त्यापूर्वी सातवाहन काळापासून महाराष्ट्र भूमी अस्तित्वात होती. 'महंत म्हणूनि महाराष्ट्र बोलिजे' असे वर्णन चक्रधरांनी महाराष्ट्राचे केलेले आहे. राष्ट्रकुट काळापासून महाराष्ट्राला अधिक महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. महाराष्ट्राला खरी ओळख प्राप्त करून दिली ती छत्रपती शिवाजी महाराज यांनी. संयुक्त महाराष्ट्राच्या ऐतिहासिक चळवळीत महाराष्ट्राचे ऐक्य आणि अखंडत्व कायम राहावे आणि मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य एकत्र यावे म्हणून १०४ हुतात्म्यांनी बलिदान दिले. समान भाषिक राज्याची अभिव्यक्ती, समान विकासाची लालसा आणि समान सांस्कृतिक अभिव्यक्ती या तीन कारणांमुळे महाराष्ट्राचे ऐक्य आणि अखंडत्व आजही टिकून आहे. महाराष्ट्र हे सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आघाडीवर असणारे प्रगतशील राज्य आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने विचार करता महाराष्ट्र देशात दुसऱ्या स्थानावर आहे; तर क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्राचा जीडीपी अव्वल असून, राज्यातील जनतेचे सुखसमाधानही वाखाणण्याजोगे आहे. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज, एकनाथ महाराज, नामदेव महाराज, सावतामाळी यांसारख्या संतांची परंपरा ही मराठी संस्कृतीचे भूषण आहे. राष्ट्रकुट काळापासून महाराष्ट्राला अधिक महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. महाराष्ट्राला खरी ओळख प्राप्त करून दिली ती छत्रपती शिवाजी महाराज यांनी. हिंदवी स्वराज्याची स्थापना करून शिवाजीराजांनी संबंध दक्षिण भारत मुक्त केला. पुढे पहिल्या बाजीरावाच्या काळात मराठ्यांनी अटकेपार झेंडे रोवले आणि दिल्लीचे तख्त खरोखरीच राखिले. १८१८ मध्ये ब्रिटिशांनी मुंबई राज्याची मुहूर्तमेढ रोवली आणि १९४७ पर्यंत मुंबईच्या माध्यमातून पश्चिम भारतावर राज्य केले. पुढे भारताच्या स्वातंत्र्यानंतरही १९४७ ते १९६० मुंबई राज्य अबाधित राहिले. या राज्यात गुजरात, कर्नाटकातील काही भाग सामील होता. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या ऐतिहासिक चळवळीत महाराष्ट्राचे ऐक्य आणि अखंडत्व कायम राहावे आणि मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य एकत्र यावे म्हणून १०४ हुतात्म्यांनी बलिदान कदापी विसरता येणार नाही. समान भाषिक राज्याची अभिव्यक्ती, समान विकासाची लालसा आणि समान सांस्कृतिक अभिव्यक्ती या तीन कारणांमुळे महाराष्ट्राचे ऐक्य आणि अखंडत्व टिकून आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीतील पहिला कालखंड १९६० ते २००० होय. यापैकी १९६० ते १९७५ हा कालखंड यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांच्या प्रभुत्त्वाचा कालखंड होता. या काळात महाराष्ट्रात सहकारी चळवळ, शेती, उद्योग, शिक्षण यांच्या विकासाचा पाया घातला गेला. या कालखंडातील महाराष्ट्रातील प्रगतीचा आढावा घेत असताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी घातलेल्या पायाभूत बैठकीचा विचार महत्त्वाचा ठरतो. त्यांनी महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळाची स्थापना केली. मराठी विश्वकोष स्थापन केला आणि त्याबरोबरच मराठीच्या विकासासाठी मौलिक पावले टाकली. पुढे १९७२ च्या दुष्काळाने महाराष्ट्राला घेरले; पण या दुष्काळाचाही महाराष्ट्राने निकराने सामना केला. इंदिरा गांधींनी एका बैठकीत महाराष्ट्रात इतकी कृषी विद्यापीठे आहेत, परंतु हरित क्रांती कुठे आहे, असा प्रश्न विचारला होता. त्यामुळे व्यथित होऊन वसंतराव नाईक यांनी त्यावेळी राज्यात हरितक्रांती घडवून आणण्यासाठी जोरकस प्रयत्न केले.पुढे शरद पवारांनी केलेल्या फलोत्पादन क्रांतीने महाराष्ट्रातील कृषी जीवनाचे चित्र पालटण्यास मदत झाली. मनोहर जोशी यांनी महाराष्ट्राला प्रगत माहिती तंत्रज्ञान धोरण दिले आणि राज्यातील पुणे शहर हे आयटी सिटी म्हणून उदयास आले. विलासराव देशमुख यांनी समतोल विकास साधला. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात औद्योगिक आघाडीवरही आहे. त्यातून गुजरातला मागे टाकून महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक गुंतवणुकीचे राज्य बनू पहात आहे. परकीय गुंतवणूक आकृष्ट करण्यामध्ये महाराष्ट्राचा बहुतांश वेळा पहिला क्रमांक पटकाला आहे. कृषी क्षेत्रातील स्वयंपूर्णता आणि औद्योगिक क्षेत्रातील नव्या-नव्या औद्योगिक वसाहतींचा उदय यामुळे राज्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळत गेली. विशेषतः, गेल्या काही वर्षांत वाहननिर्मितीच्या क्षेत्रात महाराष्ट्रातील मुंबईप्रमाणेच पुणे, छत्रपती संभाजीनगर या शहरांनी घेतलेली झेप उल्लेखनीय आहे. त्याचप्रमाणे औषधे आणि रसायने या क्षेत्रांतही महाराष्ट्र देशात अव्वल स्थानावर आहे. ऊर्जा निर्मितीतही महाराष्ट्राने केलेले प्रयोग महत्त्वाचे आहेत. महाराष्ट्रातील साखर उद्योगाने देशात आणि जागतिक बाजारपेठेत उत्तुंग झेप घेऊन एक नवा मापदंड प्रस्थापित केला आहे. साखरेप्रमाणेच इथेनॉलनिर्मितीमध्येही चांगले यश मिळवून देशाचे इंधनावरील परावलबित्व संपवण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टामध्ये महाराष्ट्र मोलाचा वाटेकरी ठरणार आहे. पायाभूत सुविधांच्या विकासाचा विचार करता रस्ते मार्गांचे महत्त्व सर्वाधिक असते. रस्ते म्हणजे त्या-त्या राष्ट्राच्या जीवनरेषा असतात. त्यादृष्टीने महाराष्ट्रातील महामार्गांचा विकास आणि अंतर्गत वाहतुकीसाठीच्या रस्त्यांची उभारणी यामुळे दळणवळणाला मोठी चालना मिळाली आहे. रस्तेमार्गांबरोबर महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत विमानतळांचा विकास होतो आहे. शिर्डी विमानतळाने उत्पन्नाच्या बाबतीमध्ये मुंबईनंतर दुसरा क्रमांक मिळवला. महाराष्ट्राला लाभलेले निसर्गाचे वरदान, समुद्रकिनारे, धबधबे, प्राचीन लेणी, गडकिल्ले आणि इतिहासकालीन वास्तू, मंदिरे यामुळे राज्याने पर्यटनाच्या क्षेत्रातही जागतिक पातळीवर आपला ठसा उमटवलेला आहे. गेल्या काही वर्षांत राज्यातील कृषी पर्यटनाकडेही पर्यटकांचा ओढा वाढत चालला असून, त्यातून शेतकऱ्यांना एक नवा पूरक व्यवसाय उपलब्ध होऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास हातभार लागला आहे. महाराष्ट्रात अप्रिय घटना घडत नसल्यातरी ज्या काही अप्रिय घटना घडल्या आहेत यावर चिंतन करण्याची गरज आहे. नासिकमधील घटना असो किंवा अन्य एकात्मेस तडा जाणाऱ्या घटना पाहून महाराष्ट्रातील नागरिकांनी विचार केला पाहिजे. महाराष्ट्राचा इतिहास हा गौरवशाली आहे. सर्वाधिक देशाभिमानी स्वातंत्र्यवीर या राज्यात झाले. लोकमान्य असो किंवा सावरकर असोत, चाफेकरबंधू असोत ब्रिटीशांना हादरुन सोडणारे तरणेबांड महाराष्ट्रीय होते याचा सार्थ अभिमान राज्यातील नागरिकांना आहे. महाराष्ट्र दिन साजरा करताना एक बाब लक्षात ठेवावी, महाराष्ट्र एक संघ असला पाहिजे. देशाभिमानी पिढी निर्माण झाली पाहिजे. इतर भाषाप्रमाणे मराठी भाषा आली पाहिजे. मराठी भाषा ही प्रेम, एकात्मकता व एकसंघ ठेवणारी आहे.राज्याची शान व मान वाढविली पाहिजे. सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# गौतम बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान

वैशाख महिन्यातील पौर्णिमा हा दिवस भारतीय तसेच जागतिक सांस्कृतिक परंपरेत अत्यंत पवित्र, चिंतनशील आणि मूल्यप्रधान मानला जातो. याच दिवशी मानवजातीला करुणा, अहिंसा, समता आणि प्रज्ञेचा सार्वत्रिक संदेश देणाऱ्या गौतम बुद्ध यांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण हे तीनही महत्त्वपूर्ण प्रसंग घडल्याची परंपरा आहे. त्यामुळे हा दिवस केवळ धार्मिक विधींचा उत्सव नसून मानवी मूल्यांचे पुनरुज्जीवन करणारा, आत्मपरीक्षणाची प्रेरणा देणारा आणि सामाजिक परिवर्तनाला चालना देणारा एक महत्त्वपूर्ण पर्व ठरतो. आजच्या वेगवान, तणावग्रस्त आणि स्पर्धात्मक जीवनशैलीत, जिथे माणूस भौतिक प्रगतीच्या मागे धावताना मानसिक शांतता, नैतिकता आणि सामाजिक समतेपासून दूर जात आहे, अशा परिस्थितीत गौतम बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान अधिकच सुसंगत आणि आवश्यक ठरते.



गौतम बुद्धांचा जन्म इ.स.पूर्व सहाव्या शतकात लुंबिनी येथे शाक्यकुलात झाला. त्यांचे बालनाव सिद्धार्थ होते. राजघराण्यातील ऐश्र्वर्यपूर्ण वातावरणात त्यांचे बालपण गेले, परंतु त्यांच्या संवेदनशील मनाला जीवनातील दुःखाचे वास्तव सतत अस्वस्थ करत होते. वृद्धत्व, रोग आणि मृत्यू या अपरिहार्य सत्यांचे दर्शन झाल्यानंतर त्यांच्या मनात जीवनाच्या मूलभूत प्रश्र्नांची तीव्र जिज्ञासा निर्माण झाली. जीवन दुःखमय का आहे? आणि या दुःखातून मुक्तीचा मार्ग कोणता? या प्रश्र्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यांनी राजवैभवाचा त्याग करून संन्यासाचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ वैयक्तिक नव्हता, तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी केलेली एक महान साधना होती.

ज्ञानाच्या शोधात त्यांनी विविध गुरूंकडून शिक्षण घेतले, कठोर तपश्र्चर्या केली, परंतु त्यांना अपेक्षित समाधान मिळाले नाही. शेवटी त्यांनी अतिभोग आणि अतितप या दोन्ही टोकांच्या मार्गांचा त्याग करून 'मध्यम मार्ग' स्वीकारला. बोधीवृक्षाखाली गहन ध्यानसाधना करून त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते 'बुद्ध' म्हणजेच 'जागृत' झाले. या ज्ञानप्राप्तीने त्यांनी मानवी जीवनाचे सत्य उलगडले आणि दुःखातून मुक्तीचा मार्ग दाखवला.

बुद्धांचे तत्त्वज्ञान मूलत: मानवकेंद्रित आहे. त्यांनी कोणत्याही अलौकिक शक्तीवर अवलंबून राहण्याऐवजी मानवी अनुभव, विवेक आणि आचरण यांना महत्त्व दिले. त्यांच्या शिकवणीत मनुष्य स्वतःच्या कर्माचा निर्माता आहे आणि त्याच्या कृतींवरच त्याचे भवितव्य अवलंबून आहे, ही स्पष्ट भूमिका दिसते. हा दृष्टिकोन माणसाला स्वावलंबन, जबाबदारी आणि नैतिकतेची जाणीव करून देतो.

गौतम बुद्धांनी मांडलेली 'चार आर्य सत्ये' ही त्यांच्या तत्त्वज्ञानाची मूलभूत आधाररचना आहे. जीवनात दुःख आहे, दुःखाचे कारण आहे, दुःखाचा अंत शक्य आहे आणि त्या अंताचा मार्ग आहेत ही चार सत्ये ती मानवी जीवनाचे वास्तव स्पष्ट करतात. बुद्धांनी दुःखाचे मूळ 'तृष्णा' किंवा अनियंत्रित इच्छांमध्ये पाहिले आहे. ही तृष्णा माणसाला सतत असमाधानी ठेवते आणि दुःखाचे कारण बनते. म्हणूनच तृष्णेवर नियंत्रण मिळवणे आणि मनाला संतुलित ठेवणे हे सुखी जीवनासाठी आवश्यक आहे.

या दुःखातून मुक्त होण्यासाठी त्यांनी 'अष्टांगिक मार्ग' सांगितला आहे. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका, सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी या आठ घटकांचा समावेश असलेला हा मार्ग व्यक्तीला नैतिकता, मानसिक शुद्धता आणि प्रज्ञेच्या दिशेने नेतो. हा मार्ग केवळ आध्यात्मिक उन्नतीसाठी नसून तो दैनंदिन जीवनातही अत्यंत उपयुक्त आहे. या मार्गाचा अवलंब केल्यास व्यक्तीच्या विचारांमध्ये स्पष्टता, वर्तनात संतुलन आणि जीवनात समाधान निर्माण होते.

बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान सामाजिक समतेवर आधारित आहे. त्यांनी जात-पात, वर्णभेद आणि सामाजिक विषमता यांचा ठामपणे विरोध केला. त्यांच्या मते, माणसाचे मूल्य त्याच्या जन्मावर नव्हे, तर त्याच्या कर्मावर अवलंबून असते. हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारी होता आणि आजही सामाजिक न्यायाच्या चळवळींना दिशा देतो. त्यांनी 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हा मूलमंत्र दिला, जो सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कार्य करण्याची प्रेरणा देतो.

स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीनेही बुद्धांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी भिक्षुणी संघाची स्थापना करून स्त्रियांना धर्ममार्गावर समान स्थान दिले. त्या काळात स्त्रियांना धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जात असताना बुद्धांनी त्यांना समानतेची संधी उपलब्ध करून दिली. हा निर्णय केवळ धार्मिकच नव्हे, तर सामाजिक क्रांतीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा होता.

बुद्धांनी अहिंसा, करुणा, मैत्री, सत्य आणि क्षमा यांसारख्या मूल्यांचा प्रचार केला. त्यांच्या मते, खरा धर्म म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव ठेवून त्याच्या कल्याणासाठी कार्य करणे. 'करुणा' हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे. प्रत्येक जीवामध्ये समानतेने पाहणे आणि त्याच्याशी सहानुभूतीने वागणे हीच खरी मानवता आहे.

आजच्या आधुनिक युगात माणूस भौतिक प्रगतीच्या शर्यतीत इतका गुंतला आहे की त्याने मानसिक शांतता आणि नैतिक मूल्ये गमावली आहेत. ताणतणाव, नैराश्य, असंतोष आणि स्पर्धा यामुळे मानवी जीवन अधिकच क्लिष्ट झाले आहे. अशा परिस्थितीत बुद्धांचे 'मध्यम मार्ग' आणि 'संतुलित जीवन' यांचे महत्त्व अधोरेखित होते. त्यांनी सांगितलेला मार्ग संयम, सजगता आणि संतुलन यांचा आहे, जो व्यक्तीला अंतःशांती आणि समाधान देतो.

पर्यावरणाच्या संदर्भातही बुद्धांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांनी सर्व जीवांबद्दल करुणा आणि आदर बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद राखून जगणे ही त्यांच्या शिकवणीची एक महत्त्वाची बाजू आहे. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्र्वभूमीवर हा दृष्टिकोन अत्यंत उपयुक्त ठरतो.

बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान केवळ वैयक्तिक जीवनापुरते मर्यादित नसून ते सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रालाही स्पर्श करणारे आहे. त्यांनी मानवी समाजातील अन्याय, विषमता आणि शोषण यांविरुद्ध एक सुस्पष्ट आणि विवेकी भूमिका मांडली. त्यांच्या विचारांत माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्याच्या सन्मान, स्वातंत्र्य आणि समानतेचा आग्रह दिसतो. त्यामुळेच बुद्धांचे तत्त्वज्ञान हे केवळ धार्मिक चौकटीत न बसता व्यापक अर्थाने मानवतावादी आणि समाजपरिवर्तनवादी ठरते. त्यांच्या शिकवणीत कोणत्याही प्रकारच्या अंधश्रद्धेला, कर्मकांडाला किंवा रूढीपरंपरांना स्थान नाही. त्यांनी तर्क, विवेक आणि अनुभव यांच्या आधारे जीवन जगण्याचा संदेश दिला.



आधुनिक लोकशाही व्यवस्थेच्या मूल्यांशीही बुद्धांचे विचार अत्यंत सुसंगत आहेत. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही लोकशाहीची मूलतत्त्वे त्यांच्या तत्त्वज्ञानात स्पष्टपणे दिसून येतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळावी, तिच्या सन्मानाचे रक्षण व्हावे आणि ती स्वाभिमानाने जगू शकेल अशी व्यवस्था निर्माण व्हावी, हा त्यांच्या विचारांचा गाभा आहे. आजच्या काळात वाढती सामाजिक दरी, आर्थिक विषमता आणि अन्यायाच्या घटनांच्या पार्श्र्वभूमीवर बुद्धांचे विचार समाजाला अधिक न्याय्य आणि सुसंवादी बनवण्यासाठी मार्गदर्शक ठरतात.

शिक्षणाच्या क्षेत्रातही बुद्धांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी ज्ञानाला केवळ माहितीपुरते मर्यादित न ठेवता त्याचा उपयोग जीवन समजून घेण्यासाठी आणि आत्मविकासासाठी करावा, असा संदेश दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्र्न विचारण्याची, विचार करण्याची आणि सत्याचा शोध घेण्याची प्रेरणा दिली. स्वतःच्या अनुभवातून सत्य जाणून घ्या ही त्यांची भूमिका आजच्या वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध दृष्टिकोनाशी पूर्णपणे सुसंगत आहे. शिक्षण हे केवळ रोजगार मिळवण्यासाठी नसून ते व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी असावे, ही त्यांची शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे.

बुद्धांचे तत्त्वज्ञान मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही अत्यंत उपयुक्त आहे. आजच्या युगात तणाव, नैराश्य, चिंता आणि अस्थिरता या समस्या वाढताना दिसतात. अशा परिस्थितीत 'सम्यक स्मृती' आणि 'सम्यक समाधी' या संकल्पना अत्यंत प्रभावी ठरतात. सजगता (माइंडफुलनेस) आणि ध्यानसाधना यामुळे मन शांत होते, विचार स्पष्ट होतात आणि व्यक्तीला आत्मिक समाधान मिळते. त्यामुळेच आजच्या आधुनिक मानसशास्त्रातही बुद्धांच्या ध्यानपद्धतीला विशेष महत्त्व दिले जाते.

पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही बुद्धांचे विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. त्यांनी सर्व जीवसृष्टीबद्दल करुणा आणि आदर बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद राखून जगणे, संसाधनांचा मर्यादित आणि जबाबदारीने वापर करणे आणि सर्व जीवांचे संरक्षण करणे ही त्यांची शिकवण आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्र्वभूमीवर अत्यंत उपयुक्त ठरते. मानवी विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन राखण्याची गरज त्यांनी अप्रत्यक्षपणे अधोरेखित केली आहे.

बुद्धांचे तत्त्वज्ञान जागतिक स्तरावरही प्रभावी ठरले आहे. आशियातील अनेक देशांनी त्यांच्या शिकवणीचा स्वीकार करून आपली सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्था घडवली आहे. त्यांच्या विचारांची सार्वत्रिकता आणि साधेपणा यामुळे ते सर्व स्तरांतील लोकांना समजण्यास आणि आचरणात आणण्यास सोपे वाटतात. त्यामुळेच बुद्धांचे तत्त्वज्ञान हे एका विशिष्ट धर्मापुरते मर्यादित न राहता संपूर्ण मानवजातीसाठी उपयुक्त ठरते.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात, जिथे विविध संस्कृती, विचारप्रवाह आणि जीवनशैली एकत्र येत आहेत, तिथे सहिष्णुता, संवाद आणि परस्पर आदर या मूल्यांची आवश्यकता अधिकच वाढली आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान या सर्व मूल्यांना प्रोत्साहन देते. त्यांनी द्वेषाऐवजी मैत्री, हिंसेऐवजी अहिंसा आणि स्वार्थाऐवजी परोपकार यांचा पुरस्कार केला. त्यामुळेच त्यांच्या विचारांमुळे जागतिक शांतता आणि सौहार्द निर्माण होण्यास मदत होऊ शकते.

गौतम बुद्धांचे जीवन आणि तत्त्वज्ञान हे केवळ भूतकाळातील एक ऐतिहासिक घटना नसून ते आजच्या आणि भविष्यातील समाजासाठीही मार्गदर्शक आहे. त्यांच्या शिकवणीतून आपण केवळ वैयक्तिक जीवनातील समस्या सोडवू शकत नाही, तर समाजातील व्यापक प्रश्र्नांनाही सामोरे जाऊ शकतो. त्यांनी दिलेला 'मध्यम मार्ग' हा अतिरेक टाळून संतुलित जीवन जगण्याचा मार्ग आहे, जो आजच्या युगात अत्यंत आवश्यक आहे.

वैशाख पौर्णिमेच्या निमित्ताने आपण बुद्धांच्या विचारांचे केवळ स्मरण न करता ते आपल्या जीवनात प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. करुणा, समता, प्रज्ञा आणि अहिंसा या मूल्यांचा अंगीकार केल्यास आपण अधिक शांत, सुसंवादी आणि न्याय्य समाज निर्माण करू शकतो. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या वर्तनात आणि विचारांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणल्यासच खऱ्या अर्थाने बुद्धांचे तत्त्वज्ञान साकार होईल.

आजच्या पिढीसमोर अनेक आव्हाने आहेत. स्पर्धा, ताण, नैतिक अधःपतन, सामाजिक विषमता आणि पर्यावरणीय संकट. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी केवळ बाह्य उपाय पुरेसे नाहीत, तर अंतर्मुख होऊन स्वतःच्या विचारांमध्ये आणि वर्तनात बदल घडवणे आवश्यक आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान या परिवर्तनासाठी एक प्रभावी मार्ग दाखवते. त्यांच्या शिकवणीतून आपण संयम, सजगता, सहानुभूती आणि विवेक या गुणांचा विकास करू शकतो.

शेवटी असे म्हणता येईल की गौतम बुद्ध यांचे मानवतावादी तत्त्वज्ञान हे संपूर्ण मानवजातीसाठी एक अमूल्य वारसा आहे. त्यांच्या विचारांची सार्वत्रिकता, साधेपणा आणि उपयुक्तता यामुळे ते काळाच्या कसोटीवर टिकून राहिले आहेत. वैशाख पौर्णिमेच्या या पवित्र दिवशी आपण त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करून आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा संकल्प करूया. करुणा, प्रज्ञा आणि समतेच्या या मार्गावर चालत आपण अधिक सुंदर, शांततापूर्ण आणि न्याय्य जग निर्माण करू शकतो-हीच या दिनाची खरी शिकवण आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्र, पाली आणि बौद्ध धम्माचे अभ्यासक आहेत)**

# 'सुपर एल निनो': २०२६ चा उन्हाळा आणि उष्माघाताचे संकट - वेळीच व्हा सावध!

निसर्गाचे चक्र बदलत असून यंदा उन्हाळ्याने रौद्र रूप धारण करण्यास सुरुवात केली आहे. राज्याच्या अनेक भागांत तापमानाचा पारा चाळीशी पार गेला असून, सूर्याच्या प्रखर किरणांमुळे नागरिक होरपळून निघत आहेत. हवामान तज्ज्ञांच्या मते, २०२६ हे वर्ष भारताच्या हवामान इतिहासातील सर्वात उष्ण वर्ष ठरण्याची शक्यता आहे. या भीषण परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रशासनाने 'हीट वेव्ह'चा (उष्णतेची लाट) इशारा दिला असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

जागतिक हवामान बदलामध्ये 'सुपर एल निनो' ही घटना महत्त्वाची भूमिका बजावत आहे. समुद्र सपाटीचे तापमान वाढल्यामुळे जगभरातील हवामानावर याचे विपरीत परिणाम होतात. यामुळे भारतात मान्सूनवर परिणाम होण्याची आणि उन्हाळ्याची तीव्रता कमालीची वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अनेक राज्यांत तापमान ४५ओसेल्सीअस वर जाण्याचे संकेत आहेत.

भारतीय हवामान विभागाच्या (IMD) मानकानुसार किनारी प्रदेशासाठी: सलग दोन दिवस कमाल तापमान ३७ओसेल्सीअस पेक्षा जास्त राहिल्यास. जेव्हा तापमान नेहमीच्या सरासरीपेक्षा ४.५ओसेल्सीअस ते ६.४ओसेल्सीअस ने वाढते, तेव्हा त्याला 'उष्णतेची लाट' म्हणतात. : जेव्हा तापमान सरासरीपेक्षा ६.५ओसेल्सीअस पेक्षा जास्त वाढते, तेव्हा अतिउष्ण लाट (Severe Heat Wave) ही स्थिती जीवघेणी ठरू शकते.

उष्माघाताची लक्षणे: वेळीच ओळखा धोका

उष्माघात ही केवळ थकव्याची अवस्था नसून ती एक वैद्यकीय आणीबाणी आहे. खालील लक्षणे दिसताच सावध व्हावे:

१. शरीराचे तापमान कमालीचे वाढणे पण घाम न येणे.
२. चक्कर येणे, डोकेदुखी किंवा मळमळणे.
३. त्वचा कोरडी आणि लाल होणे.
४. तीव्र तहान लागणे आणि लघवीचे प्रमाण कमी होणे.
५. लहान मुलांमध्ये प्रचंड चिडचिड आणि सुस्ती येणे.

उष्णतेपासून बचावासाठी 'हे' करा (मार्गदर्शक सूचना)

जलसंजीवन मंत्र

तहान लागलेली नसली तरीही दिवसातून किमान ३-४ लिटर पाणी प्या.

**निसर्गदत्त पेयांचा वापर करा:** लिंबू सरबत, ताक, शहाळ्याचे पाणी, आमसूल सरबत आणि घरगुती पन्हे शरीरातील ओलावा टिकवून ठेवतात.

**पोशाख आणि घराबाहेर पडताना काळजी**

बाहेर पडताना नेहमी सुती, हलके आणि पांढऱ्या किंवा फिकट रंगाचे कपडे घाला.

डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करा. डोळ्यांच्या संरक्षणासाठी गॉगल्स वापरा.

शक्यतो दुपारी १२ ते ३ या वेळेत घराबाहेर पडणे टाळा.

आहारातील बदल

प्रथिनयुक्त (High Protein) आहार आणि मांसाहार उन्हाळ्यात कमी करावा, कारण तो पचायला जड असतो.

बाहेरील उघड्यावरचे पदार्थ किंवा शिळे अन्न खाणे टाळा.

अल्कोहोल, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड कोल्ड ड्रिंक्स टाळा, कारण यामुळे शरीरातील पाणी कमी होते.

घराचे व्यवस्थापन

दुपारच्या वेळी खिडक्यांना पडदे लावून ठेवा. रात्री हवा खेळती राहण्यासाठी खिडक्या उघड्या ठेवा.

घरातील वृद्धांची आणि लहान मुलांची विशेष काळजी घ्या.

सामाजिक जबाबदारी

आपण आपल्यासोबतच मुक्या प्राण्यांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. घराबाहेर किंवा बाल्कनीत पक्ष्यांसाठी पाण्याचे भांडे ठेवा. पाळीव प्राण्यांना सावलीत बांधा आणि त्यांना पुरेसे पाणी द्या.

**लक्षात ठेवा:** उन्हाळ्याची ही तीव्रता केवळ निसर्गाचा कोप नसून वाढते औद्योगिकीकरण आणि जंगलतोडीचा परिणाम आहे. स्वतःचे रक्षण करण्यासोबतच पर्यावरणाचे रक्षण करणे, हेच उन्हाळ्यावरील कायमस्वरूपी उत्तर आहे.

**आपत्कालीन संपर्क:** तब्येत बिघडल्यास वेळ न घालवता जवळच्या डॉक्टरांशी संपर्क साधा किंवा १०८ या हेल्पलाईनवर रुग्णवाहिकेसाठी कॉल करा.

सावध राहा, सुरक्षित राहा आणि उन्हाळ्याचा सामना धैर्याने करा!

**-प्रविण डोंगरदिवे**
उपसंपादक
विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग

# ग्रामगीता मानवी जीवनाचा आदर्श मानदंड: प्राचार्य डॉ. आर.एम. मांजरे



**उदगीर/प्रतिनिधी :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ११७ वी जयंती छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र-प्राचार्य डॉ. आर. एम. मांजरे होते. तर विचार मंचावर प्रबंधक श्री.बी. के.पाटील व श्री दिलीप पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम संत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या विचार कार्यावर प्रकाश टाकताना डॉ.मांजरे म्हणाले की माणिक बंडोजी इंगळे उर्फ ठाकूर म्हणून जन्माला आलेले २० व्या शतकातील ते एक महाराष्ट्रातील थोर समाज सुधारक, कवी आणि राष्ट्रसंत होते. त्यांनी लिहिलेली ग्रामगीता हे त्यांचे अलौकिक स्वरूपाचे साहित्य विषयक कार्य होते. ज्याद्वारे त्यांनी समाजाला ग्रामविकासाचा व राष्ट्रवादाचा संदेश दिला.अंधश्रद्धा निर्मूलन, जातीभेद दूर करणे, ग्राम खच्छता आणि सामाजिक जागृतीसाठी भजनांचा व कीर्तनांचा प्रभावी वापर केला.अमरावती जिल्हयातील मोझरी या गावी गुरुकुंज आश्रमाची स्थापना करून अध्यात्मिक कार्य लोकांपर्यंत पोहचवले असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन जयंती समिती प्रमुख तथा मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. सुरेश शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन सहसंयोजक प्रा. डॉ .डी.बी. मुळे यांनी केले. या कार्यक्रमाला प्राध्यापक, व शिक्षकेतर कर्मचारी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

# मेथी, जिरे आणि ओवा एकत्र खा आणि या समस्यांना पळून लावा



स्वयंपाक घरातील मसाल्याच्या भांड्यात मेथी, जिरे आणि ओवा हे मसाले हमखास असतात. कारण या मसाल्यांमुळे जेवणाची चव वाढण्यास मदत होते. विशेष म्हणजे हे जेवढी जेवणाची चढ वाढवतात तेवढेच हे आरोग्यासाठी देखील उत्तम असतात. त्यामुळे याचा आहारात हमखास वापर केला जातो. मात्र, हेच मसाल्याचे तीनही प्रकार एकत्र खाल्यास अनेक समस्या दूर होण्यास मदत होते. चला तर जाणून घेऊया हे तीनही जिन्नस एकत्र खाल्लाने कोणकोणत्या समस्या दूर होण्यास मदत होते.

गॅस कमी होतो-मेथी, ओवा आणि जिरे फ्लेव्होनॉइड अँटीऑक्सिडंट्स सारख्या दाहक-विरोधी गुणधर्मांनी समृद्ध असतात. यामध्ये असलेले अँटिऑक्सिडंट शरीरातील जळजळ कमी करण्यासाठी प्रभावी ठरू शकतात. याशिवाय, हा एक चांगला दाहक-विरोधी एजंट आहे जो शरीराची जळजळ कमी करू शकतो. या तिन्हींच्या मिश्रणाने पोटातील गॅस आणि ॲसिडिटीपासून आराम मिळू शकतो.

एक्झामाची लक्षणे कमी होतात

एटोपिक डर्माटायटीस किंवा एक्जिमा ही अशी स्थिती आहे ज्यामुळे त्वचेवर पुरळ आणि जळजळ होते. याशिवाय एक्जिमामुळे जळजळ, खाज सुटणे, त्वचेला भेगा पडणे, खडबडीत त्वचा होणे. या सर्व समस्यांमध्ये मेथी जिरे आणि ओवा दाणे तुमच्यासाठी प्रभावी ठरू शकतात. यामध्ये असलेले गुणधर्म एक्जिमापासून आराम देऊ शकतात.

त्वचेवरील पांढरे डाग

मेथी, ओवा आणि जिरे यांच्या मिश्रणाने तयार केलेली पेस्ट लावल्यास त्वचेवरील पांढरे डाग किंवा ल्युकोडर्मा ग्रस्त भागांपासून आराम मिळू शकतो.

वजन कमी करण्यात प्रभावी

मेथी, ओवा आणि जिरे यांचे मिश्रण आपल्या शरीरातील चयापचय गती वाढवू शकते. हे मिश्रण आपल्या शरीरातील अतिरिक्त चरबी जाळण्यास मदत करते. तुमच्या दैनंदिन जीवनात या मिश्रणाचा नियमित समावेश करून तुम्ही वाढत्या शरीराचे वजन नियंत्रित करू शकता. तसेच, यामुळे शरीराची वाढती जळजळ कमी होऊ शकते. मधुमेहावर होते नियंत्रण

मेथी, ओवा आणि जिरे यांचे मिश्रण शरीरातील इन्सुलिनची पातळी नियंत्रित ठेवण्यास उपयुक्त ठरू शकते. यात मधुमेहविरोधी गुणधर्म आहेत. ज्यामुळे शरीरातील इन्सुलिनची पातळी कमी होऊ शकते. याच्या मदतीने तुम्ही मधुमेहाच्या समस्यांवर नियंत्रण ठेवू शकता.

खाज सुटणे-मेथी, ओवा आणि जिऱ्यामध्ये जंतुनाशक गुणधर्म असतात. जे तुम्हाला खाजेवर फायदेशीर ठरू शकतात. हे तुमच्या त्वचेवर होणार्या अनेक प्रकारच्या जीवाणू आणि संसर्गाच्या समस्यांपासून आराम देऊ शकते. त्याच वेळी, अंतर्गत समस्या कमी करण्यासाठी, तुम्ही हे मिश्रण पाण्यात घालून पिऊ शकता. यातून तुम्हाला खूप फायदा होईल. मेथी, जिरे आणि अजवाईन शरीरातील समस्या कमी करू शकतात. परंतु, लक्षात ठेवा की जर तुम्हाला कोणत्याही प्रकारची समस्या असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच या मिश्रणाचे सेवन करा.

## जीन्सशी संबंधित काही रंजक गोष्टी



जीन्स कदाचित एकमेव गोष्ट आहे जी कधीही फॅशनच्या बाहेर गेली नाही. तथापि, कालांतराने, जीन्सच्या संरचनेत आणि फोटोमध्ये बरेच बदल दिसून आले आहेत. इतकंच नाही तर त्याची स्टाइल आणि डिझाइन्सही खूप वाढली आहेत. आज प्रत्येक बॉडी टाईप आणि प्रत्येकाच्या गरजा लक्षात घेऊन जीन्स बाजारात उपलब्ध आहेत.

सगळ्यांची आवडती आणि अगदी कॉमन जीन्स पाहून त्यामागचा इतिहास किती मोठा आणि रंजक आहे याचा अंदाज लावता येणार नाही. केवळ इतिहासच नाही तर जीन्सचा पोत, त्याचे नाव, रंग आणि त्याच्याशी संबंधित सर्व गोष्टींमागे एक रंजक कथा आहे, जी आम्ही तुम्हाला येथे सांगणार आहोत.

हे नाव का पडले?

जीन्सच्या नावाबाबत अतिशय लोकप्रिय असलेली कथा अशी आहे की १९व्या शतकात फ्रान्समधील निम्स या छोट्याशा गावात प्रथम जीन्स बनवण्यात आली होती. ज्या फॅब्रिकमधून जीन्स बनवली गेली त्याला फ्रेंचमध्ये सर्ज असे म्हणतात आणि त्यामुळे सर्ज डी निम्स हे नाव पडले. हे नाव लहान करून, जीन्सला डेनिम म्हटले जाऊ लागले.

परंतु त्यांना त्यांचे अधिक लोकप्रिय आणि सामान्य नाव जीन्स कसे मिळाले याची कथा देखील खूप मनोरंजक आहे. डेनिम्स त्वरीत युरोपमध्ये लोकप्रिय झाले आणि जेनोवा या इटालियन शहराच्या खलाशांना सर्वात जास्त आवडते. जेव्हा जेव्हा हे खलाशी फ्रान्सला जात असत तेव्हा ते स्वतःसाठी मोठ्या प्रमाणात डेनिम खरेदी करत असत. ही पँट त्या खलाशांमध्ये इतकी लोकप्रिय झाली की त्यांना जीन्स ते डेनिम असे टोपणनाव देण्यात आले आणि त्याच नावाने ते अधिक प्रसिद्ध झाले.

जीन्सला निळा रंग का दिला गेला?

आज जीन्स अनेक रंग आणि पॅटर्नमध्ये आढळू शकते, परंतु आजही जीन्सचा सर्वात सामान्य आणि सर्वात आवडणारा रंग निळा आहे. याचे एक मोठे कारण आहे की जगातील पहिली जीन्स देखील निळ्या रंगात बनवली गेली होती आणि आजपर्यंत बहुतेक जीन्स याच रंगात बनवल्या जातात. जीन्सला निळा रंग देण्यामागील मुख्य कारण म्हणजे त्या काळात जीन्स मजूर आणि शेतात काम करणारे कामगार परिधान करत असत, ज्यांचे कपडे लवकर घाण होतात. त्यामुळे जीन्सला असा गडद निळा रंग देण्यात आला होता.

जीन्सच्या निळ्या रंगाचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे भारतातून युरोपला स्वस्त दरात इंडिगोची निर्यात होते. या निर्यातीपूर्वी, युरोपमध्ये, जीन्स एका प्रकारच्या पानापासून निळ्या रंगात रंगविली जात होती.

जीन्सच्या झिपरमध्येही एक खास गोष्ट आहे!

तुम्ही कधी लक्ष दिले असेल, तर तुम्हाला कळेल की तुम्ही परिधान केलेल्या, विकत घेतलेल्या किंवा पाहिलेल्या जवळजवळ प्रत्येक जीन्सच्या झिपवर इंग्रजी भाषा धघघ छापलेली आहे. याचा अर्थ धीहळवर घेसू घरलींीहळझ्ळझरळीहर म्हणजे धीहळवर ऊेरिपू डळाळींशव चा जपानी अर्थ आहे. ही कंपनी १९३४ मध्ये ताडाओ योशिदा या जपानी झिपर उत्पादकाने सुरू केली होती. आणि आजही तीच कंपनी जगभरातील बहुतेक ब्रँडेड जीन्ससाठी झिपर्स बनवते.

जीन्सच्या लहान खिशाचे कार्य काय आहे?जीन्सचा एक भाग असा असतो जो सर्वांचे लक्ष वेधून घेतो, पण त्यामागचे कारण कोणीही विचारले नाही किंवा जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही, हा भाग म्हणजे जीन्समध्ये बनवलेला एक छोटासा कप्पा आहे. आपल्यापैकी बहुतेकांना असे वाटते की हा एकतर जीन्सच्या डिझाइनचा एक भाग आहे किंवा नाणी किंवा शिक्के यासारख्या छोट्या गोष्टी ठेवण्यासाठी उपयुक्त ठरेल. तुम्ही ते वापरू शकता आणि तुमच्या गरजेनुसार आणि सोयीनुसार काहीही ठेवू शकता, पण ते बनवण्यामागचे खरे कारण काहीतरी वेगळे आहे.

हेही वाचा : जींीषळीी : आलियापासून मौनीपर्यंत, तुमच्या दिवाळी लूकसाठी २० सेलिब्रिटीच्या पोशाखांकडून घ्या प्रेरणा

हे छोटे खिसे खरे तर खिशात घड्याळे ठेवण्यासाठी बनवले गेले. जीन्समधील ही पॉकेट्स १८७९ मध्ये सुरू करण्यात आली

## अमिरात ओपेक बाहेर



देशाची इंधनाची गरज भागवण्यासाठी भारत विविध स्रोतांची चाचपणी करत आहे. अमिरातीबरोबर संबंध चांगले असल्याने तेथून तुलनेने स्वस्तात खनिज तेल घेणे भारताच्या फायद्याचे आहे.

संयुक्त अरब अमिरात या देशाने 'ओपेक' या संघटनेतून बाहेर पडण्याचा निर्णय जाहीर केला आहे. 'ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कंट्रीज' किंवा 'ओपेक' ही खनिज तेल उत्पादक व निर्यातदारांची संघटना आहे. त्याचे १२ देश सदस्य आहेत. 'ओपेक प्लस' मध्ये आणखी दहा तेल उत्पादक-निर्यातदार देश आहेत. त्यात रशिया देखील आहे. या संघटनेशी देखील अमिरातीने संबंध तोडण्याचे ठरवले आहे. त्यांचा निर्णय येत्या दि. १ मे रोजी अंमलात येणार आहे. (जागतिक) ऊर्जा सुरक्षेशी आपण बांधील आहोत. 'जागतिक बाजारपेठेत स्थिरता राहावी या हेतूने विश्वासार्ह कमी कार्बन (इंधनाचा) पुरवठा करत राहू' अशा आशयाचे निवेदन अमिरातीच्या ऊर्जा मंत्र्यांनी समाज माध्यमांवर प्रसिद्ध केले आहे. अमेरिका व इराण यांच्यातील संघर्षामुळे खनिज तेलाच्या व वायूच्या पुरवठ्यावर प्रतिकूल परिणाम झाला आहे, त्याचा फटका भारतासह अनेक देशांना बसला आहे. संयुक्त अरब अमिरातीच्या(यूएई) निर्णयामुळे इंधनाचा पुरवठा वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अमेरिका व इराणच्या ताठर भूमिकेमुळे होर्मुझची सामुद्रधुनी बंदच आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाचे दर मंगळवारी वाढून १११ डॉलर्स प्रति पिंप या पातळीवर गेले; पण अमिरातीच्या निर्णयामुळे त्यात घट झाली.

भारतास फायद्याची आशा

अमिरात सुमारे सहा दशके 'ओपेक'चा सदस्य आहे. तो खूप श्रीमंत देशही आहे. खनिज तेल व वायू यांच्या विक्रीतून त्याने पैसा कमावला. गेल्या दोन दशकांत तेथे अन्य देशांची विविध व्यवसायांत गुंतवणूक वाढल्याने त्यांच्या संपत्तीत भर पडली. 'यूएई'ने आपल्या ऊर्जा स्रोतांमध्ये मोठी गुंतवणूकही केली आहे. अमिरात दररोज सुमारे ३० ते ३४ लाख पिंपे तेलाचे उत्पादन करते. 'ओपेक' ही बहुराष्ट्रीय संघटना असली तरी त्यावर सौदी अरेबियाचा वरचष्मा आहे. खनिज तेलाचे उत्पादन किती करावे याचा निर्णय ही संघटना घेत असते. तेलाचे दर फार कमी होणार नाहीत हे बघून उत्पादनाचा कोटा ठरवला जात असतो. त्यात सर्वांत जास्त फायदा सौदी अरेबियाचा होतो अशी टीका केली जाते. अध्यक्षपदाच्या आपल्या पहिल्या कार्यकाळात डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्र संघात बोलताना या संघटनेवर टीका केली होती. अमेरिका त्यांना संरक्षण पुरवते पण ते तेलाचे दर उच्च ठेवून आमचे शोषण करतात असा त्यांच्या टीकेचा आशय होता. त्यात तथ्यही आहे. अमेरिकेत खनिज तेलाचे उत्पादन होत असले तरी देशाची गरज भागवण्यासाठी त्यांना 'ओपेक'च्या सदस्यांकडून तेल घ्यावे लागते. किमती वाढल्या तरी भारतासह अनेक देशांना त्यांच्या कडून तेल खरेदी करणे भाग पाडते. यूएई आता ओपेक मधून बाहेर पडल्याने त्यांच्यावर उत्पादनाच्या कोट्याचे बंधन राहाणार नाही. अमेरिकेने हवाई सुरक्षा पुरवली असली तरी अमिरातीच्या प्रमुख तेल व वायू उत्पादन केंद्रांवर इराणने हल्ले केले व त्यात उत्पादन केंद्र, बंदर यांचे नुकसानही झाले. आता खनिज तेलाचे व वायूचे उत्पादन वाढवून त्याची निर्यात करणे अमिरातीस शक्य होईल. त्यामुळे तेलाचे दर थोडे घटतील. तुलनेने कमी दराबद्दल अमिरातीची ख्याती आहे. अमिरातीकडून तेलाची खरेदी भारताने गेल्या चार वर्षांत एकूण आयातीच्या १०.३ टक्क्यांवरून ११.४ टक्क्यांपर्यंत वाढवली आहे. २०२२ मध्ये ११ अब्ज डॉलर्सचे तेल तेथून भारतात आले, २०२५-२६ या वर्षात १४ अब्ज डॉलर्स किमतीचे तेल भारताने तेथून खरेदी केले. जमिनीवरील पाइपलाईनद्वारे ओमानच्या आखातातील फुजैरा बंदरात अमिरात तेल आणू शकतो. तेथून ते आणणे भारतास सोपे आहे. होर्मुझची सामुद्रधुनी बंद असली तरी त्यास वळसा घालून ही निर्यात होऊ शकते. अमिरातीचे तेलाचे उत्पादन वाढण्याच्या शक्यतेने जागतिक बाजारात खनिज तेलाचे दर घसरले व शेअर बाजारांत तेजी दिसली. रशिया-युक्रेन व अमेरिका -इराण यांच्यातील युद्धाने ऊर्जेची जागतिक स्थिती अस्थिर बनली आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाही घसरला आहे. अशा स्थितीत अमिरातीकडून तेल खरेदी करणे भारतासाठी फायद्याचे ठरणार आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं. डॉक्टर लग्नाला दोन महिने झाले, पण शारीरिक संबंधात मी फारच कमी पडतो. मला तिचं समाधान करता येत नाही. मी फार आधीच संपतो. यामुळे मला आता रोज रात्री घरी जाण्याचीच भीती वाटते. आता तर माझ्यातलं पौरुषत्व संपल्यासारखं वाटतं. पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते. शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं.

## २ Joke विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.

राजू - माझ्याच वयाचे आहेत.

बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.

राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message संदेश



Sardar: Shirt K Liye Bad-hiya Kapda Dikhana?

SalesMan: PLAIN Me Dikhau?

Sardar: Hawai Jahaaz Tak Jaane Ki Kya Zarurat Hai?

## ४ Thought सुविचार



स्वत:ची इच्छा पूर्ण न झाल्याने अस्वस्थ होणारी माणसं किती आहे हे मोजण्याची गरज नाही , आणि दुसऱ्याची इच्छा आणि गरज पुरी करता आली नाही म्हणून अस्वस्थ होणारा विरळाच ! - अज्ञात

### संस्कृत सुभाषित

**हंस: श्वेतो बक: श्वेत: को भेदो बकहंसयो:।**
**नीरक्षीरविवेके तु हंसो हंसो बको बक:।।**

अर्थ - हंसही शुभ्र आणि बगळाही शुभ्रच. पण हंस आणि बगळा यात फरक तो काय? पाणी आणि दूध वेगळे करताना हंस आणि बगळा यांच्यातील भेद आपोआप समजतो.

## मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दु:खी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

### आडवे उत्तर

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अवास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

### उभे उत्तर

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस




## थोडक्यात/ संक्षिप्त

### जसप्रीत बुमराहच्या बॉलवर 'नो-लूक शॉट' मारणारा सलील अरोरा आहे तरी कोण?

**मुंबई** –मुंबई इंडियन्सविरुद्ध सनरायझर्स हैदराबाद यांच्यात २९ एप्रिल रोजी सामना रंगला. या सामन्यात एक नाव फार चर्चेत आलं. हे नाव म्हणजे सनरायझर्स हैदराबादचा सलील अरोरा! सनरायझर्स हैदराबादकडून खेळणाऱ्या सलील अरोरा या तरुण खेळाडूने आपल्या छोट्याशा पण प्रभावी खेळीमुळे सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात त्याने केलेल्या फक्त ३० धावांच्या नाबाद खेळीनेही चाहत्यांची मने जिंकली. विशेष म्हणजे जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीवर त्याने खेळलेला मनो–लुकफ सिक्स सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झाला आहे.
दमदार फिनिशिंग आणि व्हायरल शॉट
२४४ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना, सनरायझर्स हैदराबादचे गोलंदाज अभिषेक शर्मा (४५) आणि ट्रॅव्हिस हेड (७६) यांनी दमदार सुरुवात केली. अखेरीस हेनरिक क्लासेन आणि सलील अरोरा यांनी संपवाला आणि संघला सामन्या विजय मिळवून दिला. सलिलने अवघ्या १० चेंडूत ३ षटकार आणि २ चौकारांच्या मदतीने ३० धावा केल्या. बुमराहच्या १८व्या षटकातील चौथ्या चेंडूवर त्याने मनो–लुकफ सिक्स मारला.

### बुमराहच्या खराब कामगिरीनंतर पोलार्डने केले मोठे वक्तव्य!

मुंबई–मुंबई इंडियन्स विरुद्ध सनराइझर्स हैदराबाद यांच्यामध्ये काल सामना पार पडला. या सामन्यात आणखी एकदा मुंबई इंडियन्सची गोलंदाजी फेल ठरली. या सामन्यामध्ये मुंबई इंडियन्सचा रायन रिकल्टन याने शतक झळकावले आणि त्याच्या शतकीय खेळीच्या जोरावर संघाने २४३ धावा केल्या. या सामन्यात सनराइझर्स हैदराबादच्या संघाने हे लक्ष सहज पार केले आणि सलग पाचवा विजय नावावर केला. कालच्या सामन्यामध्ये मुंबई इंडियन्सच्या संघाची निराशाजनक गोलंदाजी पाहायला मिळाली. या सामन्यामध्ये जसप्रीत बुमराहच्या हाती एकही विकेट लागली नाही. त्याने या सिझनमध्ये आतापर्यंत संघासाठी फार काही प्रभावशाली कामगिरी केलेली नाही त्यामुळे संघाचा कोच पोलार्डने त्याच्या खराब फार्मबद्दल वक्तव्य केले आहे. सनराइझर्स हैदराबादविरुद्ध जसप्रीत बुमराहची खेळी सनराइझर्स हैदराबादविरुद्ध काल मुंबई इंडियन्सचा काल वानखेडेच्या मैदानावर सामना झाला. या सामन्यात सनराइझर्स हैदराबादविरुद्ध जसप्रीत बुमराह याने ४ ओव्हर टाकल्या त्यामध्ये त्याने ५४ धावा खर्च केल्या. कालच्या सामन्यामध्ये त्याची इकॉनॉमी ही १३.५० इतकी होती. यावर आता कायरन पोलार्डने काय वक्तव्य केले आहे.

### इंग्लंडच्या मॉलमध्ये मोजे चोरले...

मुंबई,–भारत आणि क्रिकेटचे नाते खूप खोल, भावनिक आणि ऐतिहासिक आहे. भारतामध्ये क्रिकेट हा फक्त खेळ नाही तर अभिमानाचा आणि एकात्मतेचा भाग आहे. भारतामध्ये क्रिकेटची ओळख ब्रिटीश काळात झाली, पण बीसीसीआयची स्थापना झाल्यानंतर क्रिकेटची व्याप्ती वाढत गेली. भारताने पहिला आंतरराष्ट्रीय सामना १९३२ साली खेळला. २५ जून १९३२ साली भारतीय टीम इंग्लंडविरुद्ध लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानात पहिली टेस्ट मॅच खेळली.पहिली टेस्ट खेळल्यानंतर भारतीय टीमने त्यानंतर अनेकदा इंग्लंडमध्ये सीरिज खेळण्यासाठी गेली, पण कायमच भारतीय टीमसाठी इंग्लंडचा दौरा कठीण आणि आव्हानात्मक राहिला, यातलाच एक दौरा भारतीय क्रिकेटपटूसाठी एका वाईट स्वप्नासारखा ठरला. १९७४ साली भारतीय टीम इंग्लंडच्या दौऱ्यावर गेली होती, तेव्हा अत्यंत वादग्रस्त घटना घडली, या घटनेमुळे भारतीय टीममधल्या खेळाडूचं आयुष्य पूर्णपणे बदलून गेलं.भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या तिसऱ्या टेस्टदरम्यान विश्रांतीवेळी भारताचे ओपनर सुधीर नाईक हे जवळच असलेल्या एकामॉलमध्ये शॉपिंग करण्यासाठी गेले.

# गुजरात टायटन्सचा आरसीबीवर ४ गडी राखून दणदणीत विजय

## विराट कोहली फेल, टीम बंगळुरू ढेर!



आयपीएल २०२६ स्पर्धेतील ४२ वा सामना गुजरात टायटन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या दोन्ही संघांमध्ये पार पडला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडलेल्या या सामन्यात गुजरातने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूवर एकतर्फी विजयाची नोंद केली आहे. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा डाव अवघ्या १५५ धावांवर आटोपला. या धावांचा पाठलाग करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने ४ गडी राखून दमदार विजयाची नोंद केली आहे.

गुजरात टायटन्सचा कर्णधार शुबमन गिलने नाणेफेक जिंकून ारने १५ धावांची खेळी केली.

गुजरात टायटन्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी १५६ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना सलामीला आलेला साई सुदर्शन अवघ्या ६ धावांवर माघारी परतला. पण त्यानंतर गिलने मिळून संघाचा डाव सांभाळला. जोस बटलरने ३९ धावांची खेळी केली. तर वॉशिंग्टन सुंदरने १२ धावा केल्या. शेवटी गुजरात टायटन्सने हा सामना ४ गडी राखून आपल्या नावावर केला.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ या हंगामातही तुफान फॉर्ममध्ये आहे. त्यामुळे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला पराभूत केल्यानंतर गुजरात टायटन्सचा आत्मविश्वास वाढणार आहे.



फ्रान्समधील पॅरिस येथे युएफा चॅम्पियन्स लीग फुटबॉल सामन्यात स्पर्धा करताना पॅरिस सेंट–जर्मेनचे खेळाडू आणि ब्रायन मुनिख.

# कॅप्टनची चूक पण शिक्षा अख्ख्या टीमला! ड्रेसिंग रुममध्ये ई–सिगारेट फुकणाऱ्या रियान परागवर बीसीसीआय ची मोठी कारवाई

मुंबई–राजस्थान रॉयल्सचा कॅप्टन रियान परागला याच्यावर बीसीसीआयने मोठी कारवाई केली आहे. पंजाब किंग्सविरुद्ध खेळल्या गेलेल्या ४० व्या मॅचमध्ये शिस्तभंगाच्या कारवाईला सामोरं जावं लागलं आहे. रियान पराग लाईव्ह मॅचमध्ये ई सिगारेट फुकत असल्याचं समोर आलं होतं. लाईव्ह कॅमेऱ्यात त्याचं हे कृत्य समोर आलं होतं. अशातच आता बीसीसीआयने रियानसह संपूर्ण राजस्थान टीमविरुद्ध कठोर पाऊल उचललं असून रियानला शिक्षा सुनावली आहे. बीसीसीआयने काय निर्णय घेतलाय.

मॅच फीच्या २५ टक्के दंड ठोठावला अन्...

आयपीएलच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी त्याला मॅच फीच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला असून त्याच्या खात्यात एक 'डिमेरिट पॉईंट' देखील जमा झाला आहे. बीसीसीआयने दिलेल्या माहितीनुसार, रियान परागने आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.२१ चे उल्लंघन केल्याचं आढळलं आहे, जे खेळाची बदनामी करणाऱ्या वर्तनाशी संबंधित आहे. पंजाब किंग्सविरुद्धच्या दुसऱ्या इनिंग्समध्ये रियान ड्रेसिंग रूममध्ये 'व्हेप' वापरताना दिसला, हे देखील बीसीसीआयने मान्य केलं आहे.राजस्थान रॉयल्सच्या कॅप्टनने.. रियानने आपली चूक मान्य केली असून मॅच रेफरी अमित शर्मा यांनी दिलेली शिक्षा त्यानं स्वीकारली आहे. त्याबरोबर आता राजस्थान रॉयल्स टीमवर देखील मोठी कारवाई होणार आहे. आयपीएलची प्रतिष्ठा जपण्यासाठी संबंधित टीम, अधिकारी आणि खेळाडूंवर अधिक कडक कारवाई करण्याच्या विचारात आहे, असं देखील बीसीसीआयने स्पष्ट केलं आहे. त्यामुळे आता कॅप्टनची चूक असताना अख्ख्या टीमला याची शिक्षा मिळणार आहे.

बीसीसीआय नक्की कोणती कारवाई करणार?

राजस्थान रॉयल्सच्या टीमवर कठोर कारवाई करण्यासाठी इतर पर्यायांची चाचपणी देखील बीसीसीआय कडून केली जात आहे, असं देखील स्पष्ट करण्यात आलं आहे. त्यामुळे राजस्थानच्या अख्ख्या टीमला याचा फटका बसणार असल्याचं पहायला मिळेल.



चीनमधील सान्या येथे ६ व्या आशियाई बीच गेम्समध्ये पुरुषांच्या वॉटर पोलो राऊंड–रॉबिन अंतिम सामन्यात स्पर्धा करताना दक्षिण कोरिया आणि कझाकस्तानचे खेळाडू.

# मुंबई इंडियन्सचा फ्लॉप शो पाहून माजी खेळाडूची पंड्यावर जोरदार टीका

मुंबई–मुंबई इंडियन्स हा आयपीएल स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात मजबूत संघ आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळताना मुंबई इंडियन्सने ५ वेळेस जेतेपदाची ट्रॉफी उंचावली होती. पण त्यानंतर मुंबईला एकही ट्रॉफी जिंकता आलेली नाही. मुंबईचा संघ आयपीएल २०२६ स्पर्धेतील सर्वात मजबूत संघांपैकी एक आहे. पण हा संघ कागदावरच मजबूत असल्याचे दिसून आले आहे. कारण मैदानावर या संघाला हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. २०२४ मध्ये झालेल्या हंगामात मुंबई इंडियन्सच्या नेतृत्वाची जबाबदारी हार्दिक पंड्याकडे सोपवण्यात आली होती. पण त्यावेळी मुंबईचा संघ गुणतालिकेत सर्वात शेवटी राहिला होता. यावेळीही अशीच काहीशी चिन्ह आहेत. मुंबईचा संघ यावेळीही सर्वात शेवटी राहू शकतो. त्यामुळे हार्दिक पंड्याच्या कामगिरीसह नेतृत्वावरही जोरदार टीका केली जात आहे.

आयपीएल २०२६ स्पर्धेत मुंबई इंडियन्सने आतापर्यंत ८ सामने खेळले आहेत. त्यापैकी केवळ २ सामन्यांमध्ये मुंबईला विजय मिळवता आला आहे. मुंबईचा संघ गुणतालिकेत ९ व्या स्थानी आहे. मुंबई इंडियन्सचा हा फ्लॉप शो पाहता, न्यूझीलंडने माजी खेळाडू आणि समालोचक सायमन डूल यांनी हार्दिक पंड्यावर जोरदार टीका करत त्याला रिलीज करण्याचा सल्ला दिला आहे. त्यांच्या मते, जर मुंबई इंडियन्सने आपला कर्णधार बदलला तर गोष्टीही बदलू शकतात.

सनरायझर्स हैदराबाद संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने २४३ धावांचा डोंगर उभारला होता. या धावांचा पाठलाग करताना हैदराबादने १९ व्या षटकात विजय मिळवला. या सामन्यानंतर क्रिकबझवर बोलताना सायमन डूल म्हणाले, ''माझा

# रजत पाटीदार वादग्रस्तरित्या आऊट; विराट कोहली संतापला

मुंबई–रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यातील आयपीएल २०२६ चा ४२ वा सामन्यात मैदानावरचा पारा चांगलाच चढला. आरसीबीचा फलंदाज रजत पाटीदार याला ज्या पद्धतीने आऊट देण्यात आलं, त्यावरून किंग विराट कोहली आणि हेड कोच अँडी फ्लॉवर थेट पंचांशी भिडल्याचं पाहायला मिळालं.

नेमकं प्रकरण काय?

प्रथम फलंदाजी करणाऱ्या आरसीबीची सुरुवात खराब झाली होती. ३५ धावांवर दोन विकेट्स पडल्यानंतर रजत पाटीदार आणि देवदत्त पडिक्कल डाव सावरत होते. ८ व्या षटकात गुजरातच्या अरशद खानने एक शॉर्ट चेंडू टाकला. पाटीदारने त्यावर पुल शॉट मारण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू बॅटच्या वरच्या कडेला लागून हवेत उडाला. डीप बॅकवर्ड स्क्वेअर लेगला उभ्या असलेल्या जेसन होल्डरने धावत जाऊन चेंडू टिपला.

होल्डरने झेल घेतल्याचा दावा केला, पण रिप्लेमध्ये चेंडू जमिनीला स्पर्श करत असल्याचा संशय दिसत होता. तरीही थर्ड अंपायरने चेंडूवर पूर्ण नियंत्रण असल्याचं मानत पाटीदारला बाद ठरवलं. हा निर्णय येताच पाटीदार स्तब्ध झाला.




त्याने पंचांकडे धाव घेत संताप व्यक्त केला. चेंडू ग्राऊंडला लागला आहे, हे ओरडून सांगत असतानाही पंचांनी त्याला मैदानाबाहेर जाण्यास सांगितलं.

विराट संतापला अन् कोचची एन्ट्री...

पाटीदार बाद झाल्यानंतर डगआऊटमध्ये बसलेला विराट कोहली स्वत:वरचं नियंत्रण गमावून बसला. आपल्या सहकाऱ्यावर अन्याय झाला आहे असं वाटताच विराटच्या चेहऱ्यावरचा संताप स्पष्ट दिसत होता. दुसरीकडे, आरसीबीचे हेड कोच अँडी फ्लॉवर यांनी थेट मफोर्थ अंपायरफ गाठला. पंचांसोबत त्यांचा जोरदार वाद झाला. स्क्रीनवर चेंडू जमिनीला लागल्याचे स्पष्ट दिसत असताना मआऊटफ कसे दिले गेले? हा सवाल त्यांनी आक्रमकपणे विचारला.पाटीदार आणि कोहलीची खेळी या संपूर्ण वादाच्या नाट्यात रजत पाटीदारला १९ धावांवर (१५ चेंडू, २ चौकार, १ षटकार) माघारी परतावे लागले. विराट कोहलीनेही आक्रमक सुरुवात केली होती, त्याने १३ चेंडूत २८ धावा (५ चौकार, १ षटकार) केल्या. मात्र, पंचांच्या या एका चुकीच्या निर्णयामुळे आरसीबीच्या गोटात तीव्र नाराजी पसरली आहे.



चीनमधील सान्या येथे ६ व्या आशियाई बीच गेम्समध्ये पुरुषांच्या व्हॉलीबॉल अंतिम सामन्यात स्पर्धा करताना इराण आणि कतारचे खेळाडू.

# भाजपमध्ये गेलेल्या हरभजन सिंगने हायकोर्टाचे दार ठोठावले

मुंबई–भारताचे माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. राज्यसभेचे खासदार असलेल्या हरभजन सिंग यांनी अलीकडेच आम आदमी पार्टी सोडून भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. मात्र, त्यांच्या सुरक्षेबाबत आता मोठा वाद निर्माण झाला आहे. हरभजन सिंग यांनी आपली सुरक्षा अचानक हटवण्यात आल्याच्या विरोधात पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयमध्ये याचिका दाखल केली आहे. त्यांनी पंजाब सरकारला थेट प्रश्न विचारला आहे की, त्यांच्या सुरक्षेत कपात का करण्यात आली?

काही दिवसांपूर्वी एक धक्कादायक प्रकार समोर आला होता. आम आदमी पार्टीच्या काही कार्यकर्त्यांनी हरभजन सिंग यांच्या घराच्या भिंतीवर मगद्दारफ असे लिहिल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. या घटनेतील संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी याचिकेत केली आहे.






दरम्यान, या याचिकेवर सुनावणी करताना पंजाब–हरियाणा उच्च न्यायालयाने पंजाब सरकार आणि केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे. पुढील सुनावणी १२ मे रोजी होणार आहे. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर जालंधर येथील त्यांच्या घराबाहेर पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता, पण नुकताच तो काढून घेण्यात आला.

राजकीय घडामोडींमध्ये, हरभजन सिंह यांच्यासह राघव चड्ढा, अशोक मित्तल, स्वाती मालीवाल, संदीप पाठक, विक्रम साहनी आणि राजिंदर गुप्ता अशा सात खासदारांनी आप सोडून भाजपमध्ये प्रवेश केल्याने मोठी खळबळ उडाली. यानंतर पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी त्यांना मपंजाबचे गद्दारफ असे संबोधले होते.

राजकीय कारकिर्दीबाबत बोलायचे झाल्यास, भारताचे माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग यांनी २०२२ साली आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी आम आदमी पार्टी मध्ये प्रवेश केला. मार्च २०२२ मध्ये आम आदमी पार्टीने त्यांना पंजाबमधून राज्यसभेसाठी नामनिर्देशित केले. ते बिनविरोध निवडून आले आणि १८ जुलै २०२२ रोजी राज्यसभा खासदार म्हणून शपथ घेतली.आम आदमी पार्टी मधील त्यांची राजकीय इनिंग सुमारे चार वर्षांची राहिली. २४ एप्रिल रोजी काही खासदार पक्ष सोडणार असल्याची माहिती भगवंत मान यांना मिळाल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम हरभजन सिंग यांना फोन केला. मात्र, सूत्रांच्या माहितीनुसार अनेक वेळा कॉल करूनही हरभजन सिंग यांनी तो उचलला नाही. दरम्यान, हरभजन सिंह सध्या आयपीएल २०२६ साठी कमेंट्री करत असून ते सध्या मुंबईत आहेत.

## मध्य रेल्वे मुंबई आणि हडपसर ते बनारस एकमार्गी विशेष गाड्या चालवणार

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रवाशांच्या मागणीनुसार मध्य रेल्वे दिनांक ३०.०४.२०२६ रोजी मुंबई आणि हडपसर ते बनारस एकमार्गी विशेष गाड्या चालवणार आहे. तपशील खालीलप्रमाणे आहे:

१. लोकमान्य टिळक टर्मिनस- बनारस एकमार्गी विशेष गाडी क्रमांक ०१०५१ एकमार्गी विशेष गाडी दिनांक ३०.०४.२०२६ रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सकाळी ११.१० वाजता सुटेल आणि बनारस दुसऱ्या दिवशी दुपारी १३.१० वाजता पोहोचेल.

थांबे: ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, जळगाव, भुसावळ, इटारसी, जबलपूर, सतना, माणिकपूर आणि प्रयागराज छिवकी.

संरचना: ८ शयनयान, ११ सामान्य द्वितीय, १ पँट्री कार आणि २ द्वितीय आसनासह गार्ड ब्रेक व्हॅन.

२. हडपसर - बनारस एकमार्गी विशेष गाडी क्रमांक ०१४५३ एकमार्गी विशेष गाडी दिनांक ३०.०४.२०२६ रोजी हडपसर येथून ०७:५० वाजता सुटेल आणि बनारस येथे दुसऱ्या दिवशी १३:५० वाजता पोहोचेल.

थांबे: ठाणे, दौंड कॉर्डलाइन, अहिल्यानगर, कोपरगाव, भुसावळ, इटारसी, जबलपूर, कटनी, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी आणि ज्ञानपूर रोड.

संरचना: ८ शयनयान, ११ सामान्य द्वितीय श्रेणी, १ पॅन्ट्री कार आणि २ द्वितीय आसनासह गार्ड्स ब्रेक व्हॅन.

आरक्षण: एकमार्गी विशेष गाडी क्रमांक ०१०५१ आणि ०१४५३ साठी विशेष शुल्कासह आरक्षण दिनांक २९.०४.२०२६ रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू होईल.

अनारक्षित डब्यांसाठी सामान्य शुल्कासह आरक्षण यूटीएस (UTS) प्रणालीद्वारे करता येईल. प्रवासी तिकीट बुकिंगसाठी रेलवन (RailOne) ॲप देखील डाउनलोड करू शकतात.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रकासाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा एनटीईएस (NTES) ॲप डाउनलोड करा.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये जलशक्ती पंधरवड्यानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये जलशक्ती पंधरवड्यानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सर्व प्रथम शाळेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमाची सुरवात प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील, संगीता शेटे, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये जल शपथ घेऊन केली.

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी जलशक्ती पंधरवड्याच्या उपक्रमांतर्गत शाळेतर्फ घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत भाग घेतला. शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पक बुद्धीचा वापर करून आपण रोजच्या दैनंदिन जीवनामध्ये पाण्याचा वापर जपून कसा करावा यावर आपले विचार निबंधातून मांडताना दिसले. या स्पर्धेमधून पाण्याचा जपून वापर कसा करावा याच्या विविध संकल्पना समोर आल्या. त्यातील काही संकल्पना शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये राबवण्यास सुरवातही केलेली आहे.

या स्पर्धेमधील विविध संकल्पना शाळेमध्ये राबवण्याचा मानस आहे असे शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी यांनी सांगितले. या स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे, शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, पालक यांनी कौतुक केले. सदरील स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## उदगीरात उष्णतेचा कहर; रस्ते ओस

**उदगीर/प्रतिनिधी :** उदगीर शहरावर उन्हाळ्याचा अक्षरश कहरच कोसळला असून आकाशातून अंगावर पडत असल्याची जाणीव नागरिकांना होत आहे. रखरखत्या उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असून दुपारच्या वेळेस शहरातील रस्ते निर्मनुष्य पडलेले असतात नेहमी गजबजणाऱ्या बाजारपेठेतही शुकशुकाट असल्याचे चित्र पहायला मिळत आहे,

प्रकाश उष्णतेच्या झळामुळे नागरिक घराबाहेर पडणे टाळत असल्याचे कळते कोल्ड्रिंक्स ज्यूस उसाचा रस तसेच इतर थंड पेय विक्रेत्याच्या दुकानावर दुपारी गर्दी नसते थंडपेयाची मागणी वाढण्याचा हंगाम असतानाच उलट बिकट परिस्थितीवर निर्माण झाल्याने व्यावसायिक आर्थिक अडचणीत आले आहेत.

दरम्यान तापमानाचा पारा चढत चालल्याने पंखे कूलर आणि एसीचा वापर प्रचंड वाढला आहे त्यामुळे विजेवरील ताण वाढून वेळोवेळी कमी दाबाचा वीज पुरवठा होत असल्याने नागरिक विविध अडचणीचा सामना करत आहेत गेल्या आठ ते पंधरा दिवसांपासून ही समस्या प्रकर्षाने जाणवत असून दैनंदिन कामकाज विस्कळीत होत आहेत.

उष्णतेच्या झळा आणि विजेच्या समस्या दुहेरी ताण सहन करावा लागत आहे वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे नागरिक हैराण झाले आहेत, अशा वाढत्या उन्हाळ्यात वीज वितरण कंपनी वीज ग्राहकांना वेळेवर वीज देणे बंधनकारक असताना अनेक वेळेस वीज गेल्याचे पहावयास मिळत असून यामध्ये शहरातील नागरिकांची या वाढत्या उष्णतेमुळे जीवाची लाही लाही होताना पहावयास मिळत आहे.

या वाढत्या उन्हाच्या पाऱ्यामुळे शहरातील अनेक रस्ते दुपारच्या वेळेस शुकशुकाट झालेले दिसून येत असून दुपारच्या वेळेस शहरात भयाण उन्हाचा पारा वाढल्यामुळे बाजारपेठ थंड झाल्याचे दिसून येत आहे.

# कडूबाई खरात यांच्या भिम बुद्ध गीत गायनाने अहमदपूरकर मंत्रमुग्ध!





**अहमदपूर/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने येथील सम्राट मित्र मंडळ या सामाजिक संघटनेच्या वतीने आयोजित केलेल्या महाराष्ट्राच्या महागायिका कडूबाई खरात यांच्या बुद्ध भीम गीतांनी अहमदपूर व परिसरातील रसिक मंत्रमुग्ध झाले.

येथील सम्राट मित्र मंडळ व बौद्ध नगर मित्र परिवाराच्या वतीने कडूबाई खरात यांच्या संगीत रजनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून पूज्य भंते महाविरो थेरो यांची उपस्थिती होती.तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा समितीचे अध्यक्ष माजी आमदार बब्रुवान खंदाडे,आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे,विद्रोही कवी राजेंद्र कांबळे,सार्वजनिक जयंती मंडळाचे अध्यक्ष सूजीत गायकवाड,जि.प. सदस्य ॲड.अजिंक्य देशमुख, पं.स.सभापती आयोध्याताई केंद्रे,नगराध्यक्ष अँड. स्वप्नील व्हत्ते,शेषेराव ससाने, नगरसेवक सावन कदम,अँड.अजिंक्य चामे,लक्ष्मणराव अलगुले, देवकत्ते सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक च्या ठिकाणी सर्व उपस्थित सर्व मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर पंचशील त्रिशरण भंते महाविरो थेरो यांनी दिले. यानंतर मंचावर मान्यवरांचा यथोचित सत्कार संपन्न करण्यात आला. त्यानंतर संगीत रजनी कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कडूबाई खरात यांनी 'हे खरंच आहे खरं, बाबासाहेब आंबेडकर, नांव हे नाव गाजते हो जगभर' या गीताने त्यांनी या कार्यक्रमाची सुरुवात केली.

पूढे 'लय मजबूत पावर हाय, माझ्या भिमाच्या नावात', 'माझ्या भिमानं सोन्याने भरली ओटी', 'आम्ही खातो त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही आहे रे, 'भीमा भिमा तूच आमची शान रे' अशा एक से बढकर एक बुद्ध भीम गीतांनी कडूबाई खरात यांनी अहमदपूरकरांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे संयोजक तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा समितीचे सचिव युवक नेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी करून अहमदपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी अडथळ्याची शर्यत कशी पार केली.याचा संपूर्ण इतिहास समाज बांधवासमोर ठेवला.तसेच सम्राट मित्र मंडळाच्या कार्याचा आढावा समोर ठेवला.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन बालाजी ढवळे सर यांनी केले.तर आभार डॉ. बालाजी थिट्टे यांनी मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी करण्यासाठी तालूकाध्यक्ष शरद सोनकांबळे,शहराध्यक्ष बजरंग गायकवाड,शरद कांबळे,मोहम्मद पठाण, तबरेज सय्यद, गफारखान पठाण,शरद बनसोडे,शिवाजीराव भालेराव,राहुल सूर्यवंशी, अमोल भालेराव,प्रशांत जाभाडे,अजय भालेराव, भीमराव कांबळे, रवी बनसोडे, विलास चापोलीकर, संतोष गायकवाड,रोहन जाधव, सचिन बानाटे,आकाश पवार,जयंती मंडळाचे अध्यक्ष मिलिंद कदम,अभिषेक ससाणे,संविधान कदम, सिद्धार्थ वाघमारे(डॉन), अनिल वाघमारे, सावळाराम बनसोडे,प्रभाष कसादे,सूशिल नवरंग, रितेश रायभोळे, दिलीप सोनकांबळे, प्रकाश लांडगे,दिनेश तिगोटे,विशाल कदम,राजू गूळवे,आनंद सोनकांबळे,भैय्यासाहेब सोनकांबळे आदींनी परिश्रम घेतले.

# उदगीर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी पदनिर्मिती व इमारत बांधकामास मंजुरी द्या



**उदगीर/प्रतिनिधी :** उदगीर येथे मार्च - २०२४ मध्ये नव्याने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (ठढज) सुरू करण्यात आले असून या कार्यालयात पदनिर्मिती, स्वतंत्र इमारत बांधकाम आणि आवश्यक प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचेकडे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी केली आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असुन संबंधित विभागास तात्काळ कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आली असल्याची माहिती माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी बोलताना दिली आहे.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी मंत्रालय, मुंबई येथे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

या भेटीदरम्यान उदगीरसह परिसरातील नागरिकांना वाहन नोंदणी, परवाने, करसंकलन यांसारख्या कामांसाठी सध्या दूरच्या ठिकाणी जावे लागते, त्यामुळे स्थानिक पातळीवर उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अत्यंत आवश्यक आहे. वाढती लोकसंख्या व दिवसेंदिवस वाहनांची वाढती संख्या आणि त्यांना पुरविण्यात येणा-या सोयी लक्षात घेता उदगीर येथे स्वतंत्र उपप्रादेशिक कार्यालय सुरू करण्यात आले आहे.

यावर परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, पदनिर्मिती प्रक्रिया, आवश्यक मनुष्यबळ उपलब्धता तसेच इमारत बांधकामाबाबत शासनस्तरावर लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे आश्र्वासन दिले. संबंधित विभागाला आवश्यक त्या सूचना देऊन प्रस्तावाला गती देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे उदगीर शहरासह परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, शासकीय सेवांचा लाभ स्थानिक पातळीवरच मिळणार आहे. तसेच यामुळे वेळ व खर्चाची बचत होऊन प्रशासन अधिक कार्यक्षम होण्यास मदत होणार आहे. या भेटीमुळे उदगीरच्या विकासाला चालना मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## शहरातील बालाजी मंदिर परिसर विकासासाठी ४० लक्ष रुपयाचा निधी मंजूर; माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांची माहिती

**उदगीर/प्रतिनिधी :** नगर परिषद हद्दीतील बालाजी मंदिर परिसरातील विविध विकासकामांसाठी राज्य शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून ४० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी दिली आहे. या निधीमुळे परिसराचा सर्वांगीण विकास होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



शहातील बालाजी मंदिर परिसर हा धार्मिक तसेच सामाजिक दृष्टीने महत्त्वाचा भाग असून येथे दररोज मोठ्या प्रमाणावर भाविकांची वर्दळ असते. मात्र, पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन शासनाकडे पाठपुरावा करून हा निधी मंजूर करून घेतला आहे. या निधीतून मंदिर परिसरात सामाजिक सभागृह, संरक्षण भिंत, जॉगिंग ट्रॅक व उद्यान विकसित करणे, मंदिर परिसरात लोकसेवा केंद्र बांधकाम करणे यासाठी सदर निधीचा उपयोग केला जाणार आहे.

या कामांमुळे मंदिर परिसर अधिक सुशोभिकरण व सुविधायुक्त होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत आमदार संजय बनसोडे यांचे आभार मानले आहेत. तसेच ही कामे लवकरात लवकर पूर्ण करुन शहरातील नागरिकांना सुविधा उपलब्ध करुन देणार असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले आहे. दरम्यान, उदगीर शहराच्या विकासासाठी भविष्यातही विविध योजनांच्या माध्यमातून अधिकाधिक निधी आणण्याचा प्रयत्न सुरू राहील, असे आश्र्वासन आ. बनसोडे यांनी दिले आहे.

# चालू वीज बिलांसह सुरक्षा ठेवीची रक्कम भरण्याचे वीजग्राहकांना महावितरणचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील वीजग्राहकांना माहे एप्रिल महिन्याच्या वीजबिलांसोबत अतिरिक्त सुरक्षा ठेव भरण्यासाठी स्वतंत्र बिले देण्यात आलेली आहेत. मात्र या अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम भरण्यास बहुतांश वीजग्राहक करत असल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या रकमेचे वीज बील मिळालेल्या वीजग्राहकांनी त्वरीत सुरक्षा ठेव व बीलाचा भरणा करून सहकार्य करावे असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता-२०२१ च्या विनियम १३.१ नुसार वीजग्राहकांकडून सुरक्षा ठेव आकारण्यात येते. दरवर्षी सुरक्षा ठेवीची पुनर्गणना करण्यात येते व त्यानुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर ग्राहकांच्या मागील एका वर्षातील सरासरी वीजवापराच्या आधारे अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम निश्र्चित करण्यात येते.

वीजग्राहकांची सुरक्षा ठेव मासिक बिल असेल तर तेथे सरासरी मासिक बिलाच्या दुप्पट आणि त्रैमासिक असेल तेथे सरासरी त्रैमासिक बिलाच्या दीडपट घेण्याची तरतूद आयोगाकडून करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे विनियम १३.११ नुसार ग्राहकाने भरलेल्या सुरक्षा ठेव रकमेवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या दराच्या सममूल्य दराने व्याजाची रक्कम वीजबिलाद्वारे समायोजित करून वीजग्राहकांना अदा करण्यात येते.

त्याप्रमाणे जिल्ह्यातील वीजग्राहकांना एप्रिल महिन्यामध्ये अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे स्वतंत्र बिल देण्यात आलेली आहेत. या बिलामध्ये नमूद सुरक्षा ठेवीची रक्कम भरण्यासंबंधीची माहिती सुरक्षा ठेवीच्या बिलामध्ये नमूद आहे. तसेच लघुदाब वीजग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम घरबसल्या भरण्यासाठी महावितरणच्या www.mahadiscom.in ही वेबसाईट व महावितरण मोबाईल पद्वारे सोय उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या बिलाची रक्कम भरून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.




## सहशिक्षक बालाजी पांचाळ यांचा तालुकास्तरीय सुलेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक

**उदगीर/प्रतिनिधी :** देगलूर तालुक्यातील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालय, वझर येथील सहशिक्षक बालाजी पांचाळ यांनी तालुकास्तरीय सुलेखन स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यांच्या या यशामुळे शाळेसह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सदर सुलेखन स्पर्धा 'शिक्षक, अधिकारी व कर्मचारी स्पर्धा २०२५' अंतर्गत पंचायत समिती देगलूर, जिल्हा नांदेड यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत तालुक्यातील अनेक शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता.

स्पर्धेतील कडव्या स्पर्धेत बालाजी पांचाळ यांनी आपल्या उत्कृष्ट हस्ताक्षर कौशल्याच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळवला. बालाजी पांचाळ हे विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय व प्रेरणादायी शिक्षक म्हणून ओळखले जातात. ते विद्यार्थ्यांना नेहमीच मार्गदर्शन करत असून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवित असतात. त्यांच्या या यशामुळे विद्यार्थ्यांमध्येही उत्साह निर्माण झाला आहे. तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्यामुळे बालाजी पांचाळ यांची पुढील विभागीय स्तरावरील सुलेखन स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मित्रपरिवार यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# लातूर महानगरपालिकेचे शिलकी अंदाजपत्रक सादर



**लातूर/ प्रतिनिधी:** लातूर शहर महानगरपालिकेचे २०२५-२६ या वर्षाचे सुधारित व सन २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रक २४ लक्ष रुपये शिल्लक दाखविणारे अंदाजपत्रक गुरुवारी (दि. ३०) रोजी मा स्थायी समिती द्वारे संमत केलेले अंदाजपत्रक हे सर्वसाधारण सभेत सादर करण्यात आले. यावर सर्व सदस्यांच्या सूचनांचा समावेश करून या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.

२०२६-२७ या वित्तीय वर्षाच्या प्रारंभी १२२ कोटी ६० लाख रुपये शिल्लक अपेक्षित आहे.या वर्षात २६३ कोटी २४ लक्ष रुपयांचे महसूली उत्पन्न,४९ कोटी २ लक्ष असाधारण जमा, कर्ज व निधीच्या माध्यमातून ६७ कोटी १५ लक्ष रुपये, विविध शासकीय कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून ४१ कोटी ९ लक्ष रुपये, भांडवली जमामधून १३५ कोटी ८६ लाख रुपये, केंद्र शासनाच्या अनुदानातून ३४८ कोटी ५३ लाख रुपये असे एकूण १०२७ कोटी ४३ लक्ष रुपयांचे उत्पन्न महानगरपालिकेला अपेक्षित आहे.या वर्षात महसुली खर्चासाठी २८४ कोटी २८ लाख रुपये, असाधारण खर्चासाठी ७० कोटी ४३ लाख रुपये, कर्ज व निधीच्या माध्यमातून ६७ कोटी १५ लाख रुपये आणि विविध शासकीय कल्याणकारी योजनासाठी ६१ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या वर्षात १८७ कोटी ५७ लक्ष रुपयांचा भांडवली खर्च तसेच केंद्र शासनाच्या अनुदानातून ३५६ कोटी ८२ लाख असा एकूण १०२७ कोटी २५ लक्ष रुपये खर्च अपेक्षित आहे.उत्पन्नातून खर्च वजा जाता २४ लक्ष रुपये शिल्लक राहण्याचा अंदाज आहे. स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले यांनी महापौरांकडे अर्थसंकल्प सादर केला. सर्वसाधारण सभेत त्यावर चर्चा झाली. यावेळी सदस्यांनी मांडलेल्या सूचनांचा अर्थसंकल्पात समावेश करण्यात आला.

या अर्थसंकल्पात वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी तरतूद करण्यात आली आहे.दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, प्रधानमंत्री आवास योजना यासाठीही विशेष निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी ५ टक्के निधी राखीव असून ई-प्रशासन विभागासाठी तरतूद करण्यात आली आहे.घनकचरा व्यवस्थापन, कचऱ्यावर प्रक्रिया यासाठी निधी दिला जाणार आहे. बायोगॅस वीज निर्मिती प्रकल्प, वरवंटी येथील कचरा डेपो अंतर्गत मंजूर विविध कामे यासाठी पैसे दिले जाणार आहेत. दृष्टीहिनासाठी मराठवाड्यातील पहिले ग्रंथालय मनापाकडून उभारले जात आहे. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी साहित्य उपलब्ध करून दिले असून त्यासाठीही निधीची तरतूद केली गेली आहे.

मालमत्ता विभागाकडून महसुली उत्पन्न वाढीसाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. मनपाच्या व्यापारी संकुलातील गाळेधारकांना ऑनलाइन सुविधा देण्याचे नियोजन आहे.मनपाच्या शाळांची दर्जा वाढ तसेच हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान, अद्ययावत सभागृहाचे बांधकाम आदींसाठी या वर्षात निधी दिला जाणार आहे. अग्निशमन सेवांचा विस्तार व आधुनिकीकरण तसेच केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत विविध योजना, भुयारी गटार,महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा उभारणी,रस्त्यांची दुरुस्ती आदींवर या वर्षात मनपा कडून खर्च केला जाणार असून शहरातील नागरिकांना सोयी सुविधा देण्यासाठी प्राधान्याने कामे केली जाणार आहेत.

# मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी 'मॅपिंग' मोहीम

- लातूर तालुक्यातील मतदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन
- २५ एप्रिलपासून बीएलओ देत आहेत घरोघरी भेट
- सन २००२ च्या मतदार यादीशी होणार पडताळणी

**लातूर/ प्रतिनिधी:** भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदार यादी अधिक पारदर्शक आणि निर्दोष करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत २००२ च्या मतदार यादीशी सर्व मतदारांचे मॅपिंग (पडताळणी) करणे अनिवार्य असून, लातूर तालुक्यातील सर्व मतदान केंद्रांवर २५ एप्रिल २०२६ पासून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) उपलब्ध आहेत.

**मॅपिंग प्रक्रियेचे स्वरूप**

दुबार आणि तिबार मतदारांचा शोध घेण्यासाठी पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूच्या धर्तीवर आता महाराष्ट्रातही मतदारांची पडताळणी केली जात आहे. मतदारांनी त्यांच्याकडील मतदार ओळखपत्र दाखविल्यानंतर बीएलओ २००२ मधील मतदारसंघ, भाग क्रमांक आणि अनुक्रमांक या आधारावर मॅपिंग करणार आहेत. ज्या मतदारांची नोंद २००२ नंतरची आहे, अशा मतदारांची पडताळणी त्यांच्या आई-वडील किंवा आजी-आजोबांच्या नावाच्या आधारावर केली जाईल.

**बीएलओंची उपलब्धता**

एप्रिल पासून दररोज सायंकाळी ४ ते ७ या वेळेत बीएलओ मतदान केंद्रावर उपस्थित राहतील. तसेच इतर वेळी बीएलओ मतदारांच्या घरोघरी जाऊन माहिती संकलित करणार आहेत. जे मतदार या मॅपिंग प्रक्रियेत सहभाग घेणार नाहीत, त्यांना आगामी 'सखोल पुनरिक्षण' (एसआयआर) मोहिमेवेळी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसमोर प्रत्यक्ष सुनावणीला सामोरे जावे लागेल. या सुनावणीत पुराव्यांची तपासणी झाल्यानंतरच मतदार यादीत नाव कायम ठेवले जाईल. ही सुनावणीची प्रक्रिया टाळण्यासाठी मतदारांनी बीएलओंना सहकार्य करून आपले मॅपिंग पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नेऱ्हे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

# दयानंद कला महाविद्यालयातर्फे सेवापूर्ती निमित्त गौरव!

- पुरोगामी विचारांचा वारसा अन् संशोधकाची प्रज्ञा; डॉ. रमेश पारवे यांचा इतिहास विभागप्रमुख पदापर्यंतचा अलौकिक प्रवास

**लातूर/ प्रतिनिधी:** येथील दयानंद कला महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. रमेश पारवे यांचा ३३ वर्षांच्या प्रदीर्घ आणि निष्कलंक सेवेनंतर भावपूर्ण निरोप समारंभ पार पडला. ३० एप्रिल २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने डॉ. रमेश पारवे, त्यांच्या पत्नी सौ. शांता पारवे व चिरंजीव शशिकांत पारवे यांचा यथोचित सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. यावेळी उपप्राचार्य डॉ.अंजली जोशी, खट-उ समन्वयक डॉ. संतोष पाटील, स्वरातीम विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ.डी. एन.मोरे पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. रमेश पारवे यांचा प्रवास अत्यंत खडतर आणि प्रेरणादायी राहिलेला आहे. अगदी दगड ओढण्याच्या कामापासून कष्ट करत त्यांनी महाराष्ट्रातील नामांकित दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद कला महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख पदापर्यंत मजल मारली. आपल्या ३३ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी अध्यापन आणि संशोधनाशी कधीही तडजोड केली नाही. एक अभ्यासू व्यक्तिमत्व, इतिहासाचे गाढे अभ्यासक आणि प्रभावी वक्ते म्हणून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या कार्याची छाप पाडली आहे.



आपल्या निरोपपर भाषणात डॉ. रमेश पारवे भावूक झाले. नोकरी लागताच वडिलांचे छत्र हरवले, पण संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी पेलत सामाजिक चळवळीतही स्वतःला झोकून दिले, अशा शब्दांत त्यांनी आपला जीवनपट उलगडला. त्यांच्या या प्रवासात त्यांनी नाती जपण्याला आणि कष्टाला सर्वोच्च स्थान दिले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड म्हणाले की, दयानंद महाविद्यालयाचा शैक्षणिक व पुरोगामी विचारांचा वारसा आहे आणि डॉ. रमेश पारवे यांनी हा वारसा खऱ्या अर्थाने समृद्ध केला आहे. आंबेडकरी विचारांचे बीज समाजात पेरण्याचे आणि चळवळीला दिशा देण्याचे काम त्यांनी आपल्या लेखणीतून आणि वाणीतून केले. संघर्षातून स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाकडून तरुणांनी जिद्द आणि चिकाटी शिकली पाहिजे.

याप्रसंगी प्रा. अमोल शिंदे, डॉ. बालाजी घुटे, डॉ. प्रदीप सूर्यवंशी, डॉ. अंकुशकुमार चव्हाण, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. स्वप्नील जाधव, प्रा. विलास कोमटवाड आणि उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनीही डॉ. रमेश पारवे यांच्या कार्याचा गौरव केला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुरेश क्षीरसागर यांनी केले तर आभार प्रा. राजू मोरे यांनी मानले.

## गर्जा महाराष्ट्र माझा

साजरा दिस सोनेरी
आयुमान रे सहासष्ट
कित्येक क्षेत्रात श्रेष्ठ
अनुभव सार्थ वरिष्ठ

हुतात्म्यांचे बलिदान
सोसले अपार कष्ट
अग्रस्थानी झळकतो
दिमाखदार महाराष्ट्र

उद्योगरोजगार संधी
समृद्ध भुमी उत्कृष्ट
इथेयेई स्वप्ने सत्यात
सकलभारत आकृष्ट

अग्र स्थानी महाराष्ट्र
देशावर येता आरिष्ट
प्रगती अखील देशा
एकमेव दृढ उद्दीष्ट

होऊन रहावे इथले
फळे मिळे स्वादिष्ट
उत्तर मिळे समर्पक
भले समस्या क्लिष्ट

अस्मितेचा अपमान
करु नका हे धारिष्ट
अहंकारी न् दुराचारी
नष्टहोतीलं ते नादिष्ट

योजना समृद्ध होती
सुजाण इथे आर्टिस्ट
महाराष्ट्राचे योगदान
रे ना संपणारी गोष्ट

हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# नांदेड शहरात मटका अड्ड्यावर पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाची धाड

- ०८ आरोपींविरुद्ध कारवाई, ३१ हजारांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड / प्रतिनिधी:** नांदेड परिक्षेत्रात कार्यरत असलेल्या अवैध व्यवसायविरोधी पथकास, नांदेड शहरातील पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दीत मटका सुरू असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती.

सदर माहितीवरून, आज दिनांक ३०/०४/२०२६ रोजी, पथकाने नांदेड शहरातील नवीन मोंढा भागातील जय गुरुदेव पान शॉप जवळच्या लिंबाचे झाडाखाली छापा टाकला असता, सदर ठिकाणी मटका खेळताना (४) इसम मिळून आले. यातील सर्व इसमांना ताब्यात घेऊन, त्यांची तपासणी केली असता, त्यांच्याकडे १५,७७०/- रुपयांची रोकड व १५,५००/- रुपयांचे (३) मोबाईल असा एकूण ३१,२७०/- रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. सदर पथकाने ताब्यातील इसमांना, मटका मालकांबाबत विचारपुस केली असता, त्यांनी सदर मटक्याचे मालक हे १) अब्बास रा.नई आबादी, शिवाजीनगर, नांदेड २) शेख जमीर, इतवारा, नांदेड व मटका बुकी चालविणारे ३) संजय गायकवाड, रा. भारत गॅस गोडवून जवळ, नवीन मोंढा, नांदेड व ४) ईश्वर जाधव, रा. खोब्रागडे नगर, नवीन मोंढा, नांदेड हे असल्याचे सांगितले. सदरबाबत, मटका खेळणाऱ्या व मटका मालकांविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/संजीव जिंकलवाड, पोकॉ/ गणेश धुमाळ व पोकॉ/ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहित केले आहे.

## वाले न्यू इंग्लिश स्कूलचे फुटबॉल स्पर्धेत यश

**लातूर/ प्रतिनिधी:** अस्मिता फुटबॉल लीग २०२५ २६ आयोजित स्पर्धा दिनांक २९ एप्रिल व ३० एप्रिल २०२६ रोजी लातूर येथील संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूल लातूर या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेमध्ये बसवणप्पा वाले न्यू इंग्लिश मिडीयम स्कूल खाडगाव रोड लातूरच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.इयत्ता नववी व दहावी च्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला त्या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. शाळेचे सचिव मा. मकरंदजी सावे सर शाळेचे प्राचार्य श्री भोगडे सर उपप्राचार्य श्री बाकलीकर सर, सुपरवायझर श्रीमती भारती मॅडम शाळेचे क्रीडा प्रशिक्षक श्री गणेश गिराम सरांनी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विविध कामे**

**ई-निविदा सूचना क्र.: 01-2026-ADEN- TRACK-SUR.** DRM(W), मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामासाठी प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **कामाचे नाव:** ADEN/PVR उपविभागांतर्गत SSE/P.way/PVR यांच्या अखत्यारीतील विविध P.way कामे; कालावधी दोन वर्षे. **कामाचा अंदाजित खर्च:** रु. २,५१,८५,५६९.७१/-. **अनामत रक्कम:** रु. ५,०३,७००.००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** २४ महिने. **देखभालीचा कालावधी:** काहीही नाही. **निविदा अर्जाची किंमत:** काहीही नाही. **www.ireps.gov.in** वर **निविदा सादर करण्याची तारीख व वेळ:** १९.०५.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **www.ireps.gov.in** वर **निविदा उघडण्याची तारीख व वेळ:** १९.०५.२०२६ रोजी १५.३० वाजल्यानंतर. **संकेतस्थळाचा तपशील: www.ireps.gov.in.** टीप: इच्छुक निविदाकारांना असा सल्ला देण्यात येतो की, निविदा सादर करण्याची अंतिम तारीख येण्यापूर्वी, या निविदेसंदर्भात जारी केलेला कोणताही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी त्यांनी संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: **www.ireps.gov.in** EXP-15

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलींग कामे**

**निविदा सूचना क्र. SUR-N-T-2026-27-06 दिनांक: २८.०४.२०२६.** DRM(S&T) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी सक्षम व प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळ **www.ireps.gov.in** वर येथे ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत: **निविदा क्र.:** SUR-N-T-2026-27-06. **कामाचे नाव व ठिकाण:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील बोरीबियाल स्थानकावर अतिरिक्त दोन लूप लाईन्सची तरतूद, तसेच शंटिंग नेक आणि AD सायडिंगची तरतूद या संदर्भातील सिग्नलींग कामे. **कामाचा अंदाजित खर्च:** ८,६३,९६,८३९.४६. **जमा करावयाची अनामत रक्कम :** १७,२७,९००. **निविदा अर्जाची किंमत:** निरंक. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने. **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** २२.०५.२०२६ रोजी १५.३० वाजल्यानंतर. सविस्तर माहिती Ireps संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कोणतीही शुद्धिपत्रे/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/टपालाद्वारे/ई-मेल, फॅक्स किंवा प्रत्यक्ष हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावर करावी. अनामत रक्कम (EMD) भरण्यासाठी नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक गॅरंटी या माध्यमांचा स्वीकार केला जाईल; तसेच, मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याची अंतिम तारीख संपण्यापूर्वी (म्हणजेच, निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाचा अपवाद वगळून), निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नियुक्त अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष जाऊन सादर करणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या. EXP-18

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलींगची कामे**

**निविदा सूचना क्र. SUR-N-T-2026-27-05 दिनांक: २८.०४.२०२६.** DRM(S&T) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांकरिता सक्षम व प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर **www.ireps.gov.in** द्वारे ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करत आहेत: **निविदा क्र.:** SUR-N-T-2026-27-05. **कामाचे नाव व ठिकाण:** सिग्नलींगची कामे मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात CTR, TRR, TTR, TSR, TFTR, TBR आणि TWR संबंधित कामांच्या अनुषंगाने करावयाची कामे. **कामाचा अंदाजित खर्च:** १,२९,४४,८७४.१९. **जमा करावयाची अनामत रक्कम:** २,५८,९००. **निविदा अर्जाची किंमत:** काहीही नाही. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने. **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** २२.०५.२०२६ रोजी १५.३० वाजल्यानंतर. सविस्तर माहिती Ireps संकेतस्थळावर उपलब्ध आहे. काही शुद्धीपत्रक/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष/टपालाद्वारे/ई-मेल, फॅक्स किंवा हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीच्या नावाने वर्ग-३ डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावर करावी. अनामत रक्कम भरण्यासाठी नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक हमी या पर्यायांचा स्वीकार केला जाईल; तसेच, मूळ बँक हमी निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच, निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाचा अपवाद वगळून) निविदा दस्तऐवजात निर्देशित केलेल्या नियुक्त अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष हाताने जमा करणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या. EXP-19

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा


## आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते राम कथा मंडपाचे पूजन

**लातूर/ प्रतिनिधी:** औसा तालुक्यातील किल्लारी येथे दि. २३ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रसंत प.पू. मोरारी बापू यांच्या राम कथा ज्ञानयज्ञाच्या भव्य सभा मंडपाचे भूमिपूजन शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी दुपारी ३:३१ वाजता औशाचे आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते होणार आहे.

किल्लारीच्या निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या भव्य मैदानावर हा राम कथा ज्ञानयज्ञ पार पडणार आहे. केवळ लातूर जिल्ह्यातूनच नव्हे तर देश - विदेशातून, आसपासच्या अनेक जिल्ह्यातून, शहरातून, शेजारच्या कर्नाटक प्रांतातील भाविक भक्तही या राम कथा ज्ञानयज्ञाचा लाभ घेणार आहेत. त्यादृष्टीने भव्य दिव्य मंडप उभारणी केली जाणार आहे. त्याचा भूमिपूजन सोहळा शुक्रवारी संपन्न होणार आहे. या सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ,असे आवाहन राम कथा आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे ४ मे रोजी आयोजन

**लातूर/ प्रतिनिधी:** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार मे महिन्यातील जिल्हास्तरीय लोकशाही दिन ४ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात होणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## दुसर्या बौद्ध साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून रोहित पिसाळ तर संमेलनाध्यक्षपदी प्रा.डॉ.प्रशांत गायकवाड यांची निवड

**लातूर/ प्रतिनिधी:** लातूर येथे दिनांक १० मे २०२६ रोजी होणार्या दुसर्या बौद्ध साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून रोहित पिसाळ यांची तर अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ.प्रशांत गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. मा.रोहित पिसाळे हे प्रसिध्द उद्योगपती तथा धम्म अभ्यासक आहेत तर प्रा.डॉ.प्रशांत गायकवाड हे पेठ वडगाव, जि. कोल्हापूर येथील श्री विजयसिंह यादव महाविद्यालयात गेली २५ वर्षे मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

फुले- आंबेडकरी विचारधारा, बौद्ध संस्कृतीतील मूल्ये, साहित्य, समीक्षा आणि तत्त्वज्ञान हे त्यांचे विशेष अभ्यास विषय आहेत. मराठी साहित्यातील बुद्धचरित्र आणि तत्त्वज्ञान: एक अभ्यास, या विषयावर त्यांनी शिवाजी विद्यापीठातून पीएचडी प्राप्त केली आहे. बौद्ध साहित्यावर आधारित धम्मपहाट (कवितासंग्रह ),तथागत बुद्ध चरित्र आणि तत्त्वज्ञान( समीक्षा), मराठी कथेतील नवे वळण : परिव्रजक (समीक्षा) हे ग्रंथ प्रकाशित आहेत. डॉ. आ.ह.साळुंखे यांच्या जीवनावर आधारित त्यांचे चरित्र लिहिण्याचे कामही डॉ. गायकवाड यांनी केले आहे. सत्य असत्याशी मन केले ग्वाही (आ.ह. साळुंखे : जीवन आणि भूमिका) (चरित्र), आ.ह. साळुंखे : विचारप्रवर्तक मुलाखती (संपादन) आ.ह. साळुंखे आणि चार्वाकदर्शन (समीक्षा) आ.ह.साळुंखे स्त्रीविषयक चिंतन (सहसंपादन) इत्यादी ग्रंथ प्रकाशित आहेत. डॉ. गायकवाड यांनी लिहिलेल्या काही नोंदी ऑनलाईन मराठी विश्वकोशात यापूर्वी प्रकाशित झाल्या आहेत. तर त्यांच्या काही ग्रंथांचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणूनही समावेश करण्यात आला आहे . यापूर्वी त्यांच्या साहित्यकृतींना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

या संमेलनाच्या चर्चा सत्रामध्ये डॉ. नारायण कांबळे, डॉ. विजय गैबीमोरे, डॉ.गिरीश मोरे, अमित मेधावी यांच्यासह अनेक साहित्यिक उपस्थित राहणार आहेत. समारोपासाठी ज्येष्ठ आंबेडकरी नेते प्रा. सुकुमार कांबळे यांची उपस्थिती आहे. तरी या संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष-चंद्रकांत शिंदे, कार्याध्यक्ष-राजेंद्र कांबळे, उपाध्यक्ष-भगवान लोखंडे, डी.एस.नरसिंगे, सचिव-यु.डी.गायकवाड, कोषाध्यक्ष - एम.एम.बलांडे, राजेंद्र बनसोडे, मुख्य निमंत्रक - ॲड.धम्मदिप बलांडे, रविंद्र राजेगावकर, शांतरक्षीत सुरवसे, डॉ.लहु वाघमारे, देवदत्त बनसोडे, अशोक बनसोडे, मारूती सरवदे, अलका गायकवाड, मंगलताई कांबळे, पल्लवी घोबाळे आदींनी केले आहे.


निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
द.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६